## भारत बनला जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था



**नवी दिल्ली :** भारताने पुन्हा एकदा आर्थिक आघाडीवर झेंडा फडकवला आहे. जपानला मागे टाकत भारत आता जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. नीती आयोगाचे सीईओ बी.व्ही.आर. सुब्रह्मण्यम यांनी याबाबत माहिती दिली. भारताची अर्थव्यवस्था जपानपेक्षा मोठी झाल्याचे आयएमएफने म्हटलंय. आयएमएफच्या आकडेवारीनुसार भारताचा जीडीपी आता चार ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे गेला आहे. आता फक्त अमेरिका, चीन आणि जर्मनी या देशांची अर्थव्यवस्था भारतापेक्षा मोठी आहे. जर सर्व काही व्यवस्थित झाले, तर पुढील अडीच ते तीन वर्षांत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, असेही या वेळी नीती आयोगाचे सीईओ सुब्रह्मण्यम यांनी १०व्या गव्हर्निंग काऊन्सिल बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३०८
www.ramprahar.com

सोमवार, २६ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


ताम्हिणी घाटात गॅस टँकर उलटून वाहतूक ठप्प/२

पोलादपुरात मांत्रिकाने केले दागिने लंपास/५

कुश मैनीने स्प्रिंट रेस जिंकत रचला इतिहास/८


# ऑपरेशन सिंदूर बदलत्या भारताची प्रतिमा


## ‘मन की बात’मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑपरेशन सिंदूर म्हणजे केवळ लष्करी कारवाई नाही, तर बदलत्या भारताची प्रतिमा आहे तसेच देशातील प्रत्येक नागरिकाने दहशतवादाचे उच्चाटन केलेच पाहिजे अशी प्रतिज्ञा घेतली आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २५) केले. या वेळी पंतप्रधानांनी भारतीय सैन्याचेही विशेष कौतुक केले.

पंतप्रधान मोदी यांनी मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. ऑपरेशन सिंदूर आणि भारतीय सैन्याच्या शौर्याबद्दल ते म्हणाले की, सशस्त्र दलांनी दाखवलेल्या शौर्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे. संपूर्ण देश दहशतवादाविरुद्ध एक झाला आहे. आपल्याला दहशतवाद संपवायचाय हा प्रत्येक भारतीयाचा संकल्प आहे.

ऑपरेशन सिंदूरने जगभरातील दहशतवादाविरुद्धच्या लढाईत नवा आत्मविश्वास आणि उत्साह दिला आहे. या लढाईत आपल्या सैन्याने स्पष्टतेने आणि अचूकतेने सीमेपलीकडील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. हे त्यांचे अदम्य धैर्य होते आणि त्यात



भारतात बनवलेल्या शस्त्रे, उपकरणे आणि तंत्रज्ञानाची ताकद समाविष्ट होती. या विजयात आमचे अभियंते, तंत्रज्ञ अशा अनेकांचा सहभाग आहे, असेही पंतप्रधान मोदी या वेळी म्हणाले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरने देशातील लोकांवर इतका प्रभाव पाडला आहे की, अनेक कुटुंबांनी हे ऑपरेशन त्यांच्या जीवनाचा एक भाग बनवले आहे. बिहारमधील कटिहार, उत्तर प्रदेशातील कुशीनगर आणि इतर अनेक शहरांमध्ये त्या काळात जन्मलेल्या मुलांचे नाव ‘सिंदूर’ असे ठेवण्यात आले, याकडेही पंतप्रधानांनी लक्ष वेधले.

### तिरंगा यात्रांनी सैन्याला सलाम!

ऑपरेशन सिंदूर केवळ एक लष्करी मोहीम नाही, तर ते आपला दृढनिश्चय, धैर्य आणि बदलत्या भारताचे चित्र आहे आणि या चित्राने संपूर्ण देशाला देशभक्तीच्या भावनांनी भरले आहे. देशातील अनेक शहरे, नगरात तिरंगा यात्रा काढल्या गेल्या. हजारो लोक हातात तिरंगा घेऊन देशाच्या सैन्याचे अभिनंदन करण्यासाठी, त्यांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी बाहेर पडले, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# मान्सून महाराष्ट्रात दाखल

**मालवण : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन झाले आहे. शनिवारी केरळमध्ये मान्सून दाखल झाला होता. त्यानंतर अवघ्या काही तासांमध्ये महाराष्ट्रात मान्सूनची एन्ट्री झाली आहे. पुढील काही दिवसांमध्ये मुंबईसह आसपास मान्सून दाखल होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

दरवर्षी जून महिन्यामध्ये मान्सूनचे महाराष्ट्रामध्ये आगमन होते, पण या वर्षी १२ दिवसांपूर्वीच मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला. जूनऐवजी मे महिन्यातच मान्सूनची एन्ट्री झाली आहे. तत्पूर्वीच राज्यात ठिकठिकाणी पावसाचा जोर होता.

मागील काही दिवसांपासून राज्यात अवकाळी पाऊस पहायला मिळाला. त्यानंतर आता मान्सूनचे आगमन झाले आहे. सध्या सुरू असलेल्या एकूणच पावसामुळे काही भागात शेतीपिकांना मोठा फटका बसत असल्याचे चित्र दिसत आहे. दुसरीकडे या पावसाने खरीप हंगामाच्या शेती मशागतीची कामे खोळंबली आहेत.

दरम्यान, हवामान संशोधन संस्थांनी सूचित केले आहे की, या वर्षी अल निनोचा प्रभाव कमजोर होतो आहे आणि ला निनाचे लक्षण दिसत आहेत. यामुळे भारतात पावसाचे प्रमाण सामान्य ते थोडक्याशा जास्त श्रेणीत राहण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती शेतीस अनुकूल ठरू शकते.

# राज्याच्या बहुतांश भागात पाऊस

### पाणी साचले, वाहने गेली वाहून; जनजीवन विस्कळीत



**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन झाले असून बहुतेक भागांत पाऊस पडला आहे. पावसामुळे पुणे-सोलापूर महामार्गावरील स्वामी चिंचोली या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी साचले. या ठिकाणी एक इनोव्हा कार वाहून गेली.

पुण्यातील इतर ठिकाणीही पावसाचा कहर पहायला मिळाला. इंदापूर तालुक्यात मुसळधार पाऊस पडला. विशेषत: भिगवण येथे पुणे सोलापूर-राष्ट्रीय महामार्गालगतच्या सर्विस रोडवर पाण्याचे तळे साचले. येथे ट्रॅक्टर वाहून गेला, तर भिगवण बसस्थानकात पाणी साचले.

कोकणात दापोली-खेड रस्त्यावरील फुरसजवळच्या एका बायपासची मोरी वाहून गेली, तर दस्तुरीजवळ पुलावर पाणीच पाणी झाले आहे. परिणामी वाहतूक थांबवण्यात आली.

## निलेश चव्हाणविरोधात लूकआऊट नोटीस

**पुणे : प्रतिनिधी**

शशांक हगवणे याचा साथीदार आणि बाळ मागण्यासाठी आलेल्या वैष्णवीच्या नातेवाईकांना धमकावणाऱ्या निलेश चव्हाणविरोधात लूकआऊट नोटीस काढण्यात आली आहे.

आपल्याच पत्नीचे आणि इतर महिलांचे अश्लील व्हिडीओ बनवल्याचा आरोप निलेश चव्हाणवर आहे. याशिवाय बंदुकीचा धाक दाखवून निलेशने वैष्णवीच्या कुटुंबीयांना धमकावले होते. तो परदेशात पळून जाऊ नये म्हणून पोलिसांनी लूकआऊट नोटीस काढली आहे.

# अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन; खांदा कॉलनीत स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजसुधारकाची भूमिका बजावत अनेक पातळ्यांवर काम केले. त्यांच्या कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खांदा कॉलनीमध्ये भाजप नवीन पनवेल मंडळाच्या वतीने आयोजित स्वच्छता अभियानावेळी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त भाजपने २१ ते ३१ मे या कालावधीत सामाजिक पर्व म्हणून विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. या उपक्रमांतर्गत, रविवारी (दि. २५) खांदा कॉलनीमधील महादेव मंदिर परिसरात



स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभाग घेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या प्रजेसमोर अनेक आदर्श निर्माण केले होते. त्यांचे कार्य पुढच्या पिढीला समजावे आणि त्यांच्या कार्याची माहिती तरुणाईला व्हावी यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही अहिल्यादेवींच्या कार्याची माहिती देऊन त्यांचे कार्य तरुण पिढीपर्यंत पोहचवण्याचे आवाहन केले.

या स्वच्छता अभियानात भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, मनोहर म्हात्रे, गणेश पाटील, कामगार नेते मोतीराम कोळी, गोपीनाथ मुंडे, जगदीश घरत, आनंदी ग्रुपचे अध्यक्ष संजय पाटील, भीमराव पोवार, संजय कांबळे, प्रभाग अध्यक्ष शांताराम महाडिक, विजय म्हात्रे, आशा मुंडे, स्वाती नांगरे, मयूर कदम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## निवडक

### लालूंनी मुलगा तेजप्रतापची केली पक्षातून हकालपट्टी

**पाटणा :** राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांनी मोठा मुलगा आणि माजी मंत्री तेजप्रताप यादव याला पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित केले आहे तसेच त्यांना कुटुंबातूनही बेदखल केल्याचे एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये स्पष्ट केले आहे. मुलाच्या बेजबाबदार वर्तनामुळे निर्णय घेतल्याचे लालूंनी म्हटले आहे.

### रशियाचा युक्रेनवर मोठा हल्ला; ३६७ ड्रोन, क्षेपणास्त्रे डागली

**किव :** युद्धादरम्यान रशियाने पुन्हा एकदा युक्रेनवर हल्ला केला. रशियाने ३६७ ड्रोन आणि क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्यात किमान १३ जणांचा मृत्यू झाला असून १२ जण जखमी झाले आहेत. हल्ल्यात इमारतींचेही नुकसान झाले आहे. दरम्यान, युक्रेनच्या हवाई दलाने २६६ रशियन ड्रोन आणि ४५ क्षेपणास्त्रे पाडल्याचा दावा केला आहे.

### देशातील पाच विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने गुजरात, केरळ, पंजाब आणि पश्चिम बंगाल येथील पाच विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक घेण्याचा निर्णय घेतला आहे. तेथे १९ जूनला मतदान, तर २३ जूनला मतमोजणी होईल.

# एनडीएच्या मुख्यमंत्री परिषदेत विविध विषयांवर विचारविनिमय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात एनडीए अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीची मुख्यमंत्री परिषद रविवारी (दि. २५) राजधानी दिल्लीत झाली. या बैठकीसाठी एनडीएचे सरकार असलेल्या २० राज्यांचे मुख्यमंत्री आणि १८ उपमुख्यमंत्री उपस्थित होते. २०२४मध्ये एनडीए-३ची स्थापना झाल्यानंतरची ही पहिलीच मोठी बैठक आहे.

दिल्लीतील अशोका हॉटेलमध्ये झालेल्या या बैठकीस भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा, गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह वरिष्ठ नेते उपस्थित होते. महाराष्ट्रातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे दाखल झाले होते. बैठकीत ऑपरेशन सिंदूरची चर्चा, जातीय जनगणनेच्या समर्थनासाठी प्रस्ताव आणि विकासाला प्राधान्य देण्यावर चर्चा झाली. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना सुरुवातीला श्रद्धांजली वाहण्यात आली.

ऑपरेशन सिंदूरचे यश हे देशाने स्वावलंबी होण्याच्या दिशेने केलेल्या कामगिरीची पुष्टी आहे, ज्यामध्ये स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाची अचूकतादेखील जगाने पाहिली आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, तर जातीनिहाय जनगणना हे प्रत्येक क्षेत्रातील उपेक्षित आणि मागासलेल्या लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या त्यांच्या सरकारच्या मॉडेलच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

या परिषदेरत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वी करणाऱ्या सशस्त्र दलांच्या शौर्याचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धाडसी नेतृत्वाचे कौतुक करणारा ठराव मांडला. तो टाळ्यांच्या कडकडाटात मंजूर झाला. जातीनिहाय जनगणनेचे समर्थन व कौतुक करणारा ठरावही या वेळी मंजूर करण्यात आला. या परिषदेत एनडीएशासित राज्य सरकारांनी स्वीकारलेल्या सर्वोत्तम पद्धतींवर अनेक मुख्यमंत्र्यांनी सादरीकरण केले.



माथेरान : प्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरान आपल्या निसर्गसौंदर्यासाठी ओळखले जाते. पावसाळ्यात तर येथील सौंदर्य अधिकच खुलते. रिमझिम पाऊस आणि धुक्याची दुलई अशा आल्हाददायक वातावरणाचा पर्यटकांनी रविवारी आनंद घेतला.




# पेरणीची घाई नको! 'वनामकृवि'च्या हवामान विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन



**परभणी : वृत्त संस्था**

सध्या राज्यातील अनेक भागांत मान्सूनपूर्व पावसाची नोंद झाली असून या पावसामुळे वातावरणात आर्द्रता वाढली आहे. मात्र, भारतीय हवामान विभागानुसार अजून मान्सूनचे अधिकृत आगमन झालेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी सद्यस्थितीत पेरणी करण्याची घाई टाळावी, असे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. कैलास कामाजी डाखोरे यांनी केले आहे.

दरम्यान सध्या दररोजच सलग पावसाचे आगमन होत असले तरी मृग नक्षत्राच्या पार्श्वभूमीवर आणि त्यानंतरही मोसमी पावसात तर खंड पडणार नाही ना अशी भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.मे महिन्याच्या शेवटी अधून मधून अवकाळी पाऊस होतो. या बिगर मोसमी पावसाच्याच दरम्यान शेतात खरीप हंगामपूर्व कामांची धांदल चाललेली असते. मात्र सध्या मोसमी पावसाप्रमाणेच वातावरण झालेले असून पावसातले सातत्य आश्चर्यकारक ठरले आहे.

या दिवसात अक्षरशः पावसाळ्यासारखे वातावरण तयार झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये म्हणून कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागाने तशा सूचना दिल्या आहेत. मान्सूनपूर्व पाऊस ही नैसर्गिक प्रक्रिया असली, तरी या पावसावर पेरणी केल्यास पुढील टप्प्यावर पिकांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत कीड-रोगांचा प्रादुर्भाव, उशिरा होणारा पाऊस किंवा अचानक कोरडा पडल्यास पीक नुकसान होऊ शकते. त्यामुळे सध्याच्या वातावरणात फक्त मशागत पूर्ण करून ठेवणे योग्य ठरेल असे या आवाहनात नमूद करण्यात आले आहे.

भारतीय हवामान विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, पुढील काही दिवसांत अजून काही ठिकाणी पावसाच्या सरी कायम राहण्याचा अंदाज आहे. मात्र हा पाऊस अपुरा व अनियमित असण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतीच्या दीर्घकालीन यशासाठी, खरीप हंगामातील पेरणीसाठी मान्सूनच्या स्थिर व सातत्यपूर्ण पावसाची वाट पाहणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन, शेतातील वापसा स्थिती योग्य प्रकारे तयार करून मशागतीची कामे उरकावीत. यामुळे पावसाळा सुरू झाल्यावर वेळेवर पेरणी करता येईल असेही आवाहन कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## कारला कट मारल्याच्या रागातून दोघांना मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

मोटार कारला कट मारल्याच्या कारणावरून स्कुटीवरील मुलांशी झालेल्या भांडणाचा राग येऊन सहा ते सात जणांनी संगनमत करून दोघांना शिवीगाळ करण्यासह जबरी मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

राहुल पाटील यांचा प्रिंटिंग प्रेसचा व्यवसाय असून ते खारघर से-१३ येथे राहतात. ते प्रिंटिंग प्रेसमध्ये असताना रात्री साडेआठच्या सुमारास त्यांचा भाऊ भूषण याने फोन करून तो व त्याचे मित्र कोन, पनवेल येथून कारने से २०, खारघर येथे आले. यावेळी तळोजा येथील तीन मुले स्कूटीवरुन जात असताना भूषण याच्या कारला कट मारण्याच्या कारणावरून त्यांच्याशी वाद झाला आणि त्यांनी भांडण केले. भूषण व राहुल यांना शिवीगाळ करत मारहाण त केली. या मारहाणीत दोघेही जखमी झाले

## उलवे नोडमधील हत्येप्रकरणी आणखी दोघांना अटक; आरोपींची संख्या पाचवर

**पनवेल : वार्ताहर**

उलव्यात राहणाऱ्या एका विवाहितेचा अज्ञाताने भररस्त्यात गळा चिरुन हत्या केल्याची खळबळजनक घटना उलवे सेक्टर-५ मध्ये दि.१८ मे रोजी घडली होती. या हत्येच्या गुन्ह्याची उकल करत नवी मुंबई गुन्हेशाखेच्या पोलिसांनी मृत महिलेच्या पतीसह तिघा जणांना काही दिवसांपूर्वी बेड्या ठोकल्या असतांनाच आता या हत्या प्रकरणातील दोघा आरोपींना नवी मुंबई गुन्हेशाखा युनिट-२ आणि उलवे पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने उत्तरप्रदेशातील नोएडा येथून बेड्या ठोकल्या आहेत.

सुखबीर निर्मल सिंग राठिया (२४) व गुरप्रीत अवतार सिंग, (२५) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

## मुंबईकरांच्या परतीच्या प्रवासाला पाली फाटा येथे ब्रेक, चार किमीची रांग

**खालापूर: प्रतिनिधी**

खोपोली पाली मार्गावर मुंबईसाठी परतीचा प्रवास करणाऱ्या प्रवासी तसेच अडलॅब इमॅजिका येथील पर्यटकांना अडथळ्यांचा सामना करावा लागला. पाली फाटा ते देवन्हावे सांगडेवाडी अशा ४ कि. मी अंतरावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या हा मार्ग पाली फाटा येथे मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाला जोडत असून



त्या मार्गावरून मुंबई, पुणे तसेच नाशिककडे जाणारी वाहने जात असतात तर मुंबई गोवा महामार्गाला पर्याय म्हणून मुंबईकर मुंबईचा परतीचा प्रवास वाकण पाली देवन्हावे पाली फाटा द्रुतगती महामार्ग असा करीत असतात.

सध्या सुट्टीचा हंगाम सुरू असून रविवार असल्याने विशेषतः या मार्गावर वाहानांची गर्दी झाली होती . त्यातच इमॅजिका मनोरंजन थिम पार्कसाठी आलेल्या पर्यटकांची वहाने ही परतीचा प्रवास करण्यासाठी या मार्गावर आल्याने वहातुक कोंडी झाली.

## ताम्हिणी घाटात गॅस टँकर उलटला, वाहतूक ठप्प

**माणगाव , पाली : प्रतिनिधी**

ताम्हिणी घाटातील मौजे डोंगरवाडी हद्दीत गॅस टँकर पलटी होऊन अपघात झाल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

ताम्हिणी घाट परिसरात सततच्या पावसामुळे रस्त्याच्या कडेचा काही भाग कोसळल्याने टँकरचे नियंत्रण सुटले आणि तो उलटला. आपत्कालीन सेवा त्वरित घटनास्थळी पोहोचल्याअसून परिसर सुरक्षित करण्यात आला आहे. ऍसिड पसरण्यापासून थांबण्यात आले आहे.

रस्त्याच्या कडेला मुसळधार पावसामुळे मातीची धूप झाल्याने, हायड्रोक्लोरिक सिड वाहून नेणारा टँकर रविवार दि. २५ मे रोजी रायगड जिल्ह्यातील ताम्हिणी घाट परिसरात उलटला. या धडकेत टँकरचे मोठे नुकसान झाले असले तरी कोणतीही जीवितहानी झालेली नाही. सुरक्षेचा उपाय म्हणून काही काळ वाहतूक बंद करण्यात आली, तसेच लोकांना सुरक्षित ठेवण्यासाठी पावले उचलण्यात आली. अधिकारी अजूनही परिसराची कोणतीही पर्यावरणीय हानी तपासत आहेत आणि रस्ता मोकळा करण्याचे काम सुरू आहे.

यामुळे पावसाळ्यात डोंगराळ भागातील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत नव्याने चिंता निर्माण झाली आहे.



## पावसाच्या आगमनामुळे गटारांची कामे खोळंबली

मुरुड : प्रतिनिधी

मुरुड शहरात गटारांची कामे खूप उशिरा सुरू झाल्याने व पाऊस खूप लवकर आल्याने शहरात पाण्याचा निचरा खोळंबला असून पहिल्या पावसाचा येथे मोठा तडाखा बसला आहे.



मुरुड शहराची लोकसंख्या १२ हजारच्यावर असून दाट नागरी वस्ती आहे.मुरुड नगर परिषदेकडून दरवर्षी गटार खोदाईचे काम दिले जाते. परंतु हे काम एप्रिल महिन्यात सुरू होणे आवश्यक होते ते मे महिन्यात सुरू केल्याने मुरुड शहरातील गटारे खोदाई व साफसफाई ची कामे खोळंबली आहेत.रस्त्यावर माती व दगडे तशीच राहिल्याने वाहतुकीस अडथळा होत आहे.मुरुड शहरातील गटार साफसफाई ची कामे यंदा ६० टक्के सुधा पूर्ण झालेले नाही.

या बाबत मुरुड नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी सांगितले की,हवामान खात्याने यंदा पाऊस लवकर असल्याचे भाकित अगोदरच केले होते. परंतु नेहमी प्रमाणे दिरंगाई करण्याची सवय असल्याने नगरपरिषदेने ही कामे मे महिन्यात सुरू केली. हेच काम १ एप्रिल रोजी सुरू केली असती तर आज संपूर्ण कामे पूर्ण झाली असती.मुरुड शहरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असून आज जिकडे तिकडे पाणीच पाणी साचले आहे.यासाठी सर्व प्रथम मुरुड नगरपरिषदेने डंपर घेऊन रस्त्यावर पडलेली दगडे व माती तातडीने उचलून रस्ता मोकळा करावा.गटार खोदाई चे काम तातडीने पूर्ण होण्यासाठी जेसीबी द्वारे जलद गतीने काम पूर्ण करून मुरुड शहरातील नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

## खोपोली-खालापूर परिसरात मुसळधार पावसाने अनेकांची उडवली तारांबळ

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली सहसंपूर्ण खालापूर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण व मान्सूनपूर्व अवकाळी पावसाचं संकट उभं झाल्याने अनेक जण चिंतेत सापडले आहेत . शनिवारी व रविवारी सतत कोसळणाऱ्या मुसळधार मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने दमदार सुरुवात केल्याने अनेकांची तारांबळ उडाली.

अनेकांनी अवकाळी पावसापासून आपल्या किमती साहित्याचा बचाव करण्यासाठी मोठी मेहनत घेतल्याचे पाहायला मिळाले. अवकाळी पावसाने,उघड्यावर वास्तव्यास असलेले ,आंबा बागायतदार शेतकरी व व्यापारी तसेच बांधकाम आणि वीटभट्टी व्यवसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रविवारी २५ मे रोजी रात्रीपासून खोपोली परिसरात सतत ढगाळ वातावरण व मधूनमधून मुसळधार पाऊस कोसळत होता . पावसाचा जोर इतका भयानक होता की, अनेकांना घराबाहेर पडणे ही मुश्किल झाले होते. त्यामुळे या अवकाळी पावसाने अनेकांचे मोठे नुकसान केल्याचे पाहायला मिळाले. तर मैदानात अथवा अन्य उघड्यावर राहणाऱ्या अनेकांचे घरांचेही नुकसान झाले आहे .



## मालडुंगेमध्ये विजेचा लपंडाव; निवेदन सादर




**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे ग्रामीण भागातील वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

ग्रुप ग्रामपंचायत मालडुंगे हद्दीमध्ये विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असून होणाऱ्या समस्येच्या संदर्भात आदिवासी ठाकूर समाज संघटना व ग्रामपंचायतचे सरपंच यांनी महावितरण विद्युत कार्यालय पनवेल -भिंगारी येथे भेट देऊन वारंवार होणाऱ्या विद्युत पुरवठ्याच्या संदर्भात वरिष्ठांकडे सकारात्मक चर्चा करून विजेच्या संदर्भामध्ये होणाऱ्या समस्या सकारात्मक पद्धतीने सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले.

या प्रसंगी आदिवासी समाजाचे कार्यकर्ते धर्मा वाघ (आदिवासी ठाकूर समाज संघटना -पनवेल अध्यक्ष), सिताराम चौधरी, चंद्रकांत सांबरी, जनार्दन निरगुडा, पद्माकर चौधरी, अर्जुन घुटे पनवेल विद्युत पुरवठा शाखेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## कारच्या काचा फोडून केला हवेत गोळीबार

**खेड : प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील खोपी फाटा परिसरात एका कारवर गोळीबार झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. मुंबई - गोवा महामार्गावर रेल्वे स्थानका नजीक खोपी फाटा परिसरात भर दिवसा हा प्रकार घडल्याने कायदा आणि सुव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



मुंबई - गोवा महामार्गावर रेल्वे स्थानका नजीक खोपी फाटा परिसरात दोन अज्ञात तरुणांनी दुचाकीवरून पाठलाग करत एका कारला थांबवलं. सुरुवातीला कारवर दगडफेक करण्यात आली. या दगडफेकीत कारच्या काचा फोडण्यात आल्या. त्यानंतर एका तरुणाने थेट रिवॉल्वर बाहेर काढून हवेत गोळीबार केल्याचे सांगण्यात येत आहे.

खेड पोलीस देखील तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. यानंतर घटनास्थळी एक कार काचा फोडलेल्या स्थितीत आढळून आली. मोटारीतील दोन व्यक्ती गोळीबार झाल्याचं सांगत होते. हा गोळीबार नेमका कोणी केला, या संदर्भात पोलिसांसह घटनास्थळी उपस्थितांना माहिती देत होते. अधिक तपास सुरू आहे.

## नवी मुंबई व उरणमध्ये प्रथमच वारसादर्शन व छायाचित्रण फेरी

**उरण : बातमीदार**

नवी मुंबईच्या इतिहासात एक नवा अध्याय जोडत, प्रथमच हेरिटेज व फोटोवॉक चे आयोजन २५ मे रोजी सकाळी ९ वाजता उरण येथे करण्यात आले.

हेरिटेज वॉक ही अभिनव संकल्पना उरणमधील निसर्ग पर्यटन तसेच ऐतिहासिक पर्यटन वाढीस लागावे म्हणून निकेतन रमेश ठाकूर यांनी, फेसबुकवरील आठवणीतले उरण या ग्रुपच्या माध्यमातून मांडली होती त्यास अनेक लोकांची पसंती आली होती निकेतन रमेश ठाकूर (बोकडविरा )आणि वेदांत श्रीकांत पाठक(बोरी) या दोन नवतरुणानी ही संकल्पना 'श्री गोपाळकृष्ण वाचनालय, देऊळवाडी' यांच्या मार्फत प्रत्यक्षात उतरवली असून, यामार्फत उपस्थित सहभागीना उरणच्या समृद्ध सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसाची ओळख करून दिली गेली.




या वारसा दर्शन व छायाचित्रण फेरीसाठी मुंबई, पुणे,खारघर, उलवे नवी मुंबई येथील तसेच उरणमधील काही रहिवासी तसेच इतिहास अभ्यासक, उत्सुक तसेच उरण बद्दल आस्था असणारे ३० लोक उपस्थित होते.आठवणीतले उरण ही वारसा दर्शन व छायाचित्रण फेरी पूर्णपणे मोफत होती व प्रायोगिक तत्वावर सहभागींना देऊळवाडीमधील सर्व ऐतिहासिक मंदिरे त्यांचा इतिहास, मंदिर स्थापत्यशैली तसेच त्या मंदिरांतील धार्मिक महत्व,सणसमारंभ यांची माहिती सांगितली

,श्री गोपाळकृष्ण वाचनालय जे ८१ वर्ष जुने आहे त्यात असणारी ३५ हजारांपेक्षा जास्त असणारी अनेक दुर्मिळ पुस्तके,जुनी पण उत्तम कौलारू बांधकाम शैली असलेलल्या श्री गोपाळकृष्ण वाचनालयाच्या सर्व संचालक मंडळ सदस्य तसेच ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचारीवृंद यांनी अशा नवोपक्रम कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला.विमला तलाव, एन. आय हायस्कूल, भिवंडीवाला बाग व प्राणिसंग्रहालय, ब्रिटिशकालीन भिवंडीवाला वॉटर वर्क्स व राजमहाल सिनेमागृह यांची माहिती सांगण्यात आली.

## दुखवटा

### विलास कांबळे



**पाली :** महाराष्ट्रातील युवा गायक तिसे (रायगड) येथील संकेत कांबळे यांचे वडील विलास देवजी कांबळे यांचे वयाच्या ६३ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले त्यांच्या पश्च्यात पत्नी, दोन मुले व दोन मुली, सुना असा परिवार आहे. त्यांचा पुण्यानुमोदन व श्रद्धांजली सभा १ जून २०२५ रोजी तिसे कोलाड येथील राहत्या घरी पार पडणार आहे. अशी माहिती संकेत कांबळे यांनी दिली.

### रवींद्र म्हात्रे

**उरण :** चिरनेर येथील नाट्यकलाकार रवींद्र मधुकर म्हात्रे(४९)यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे त्यांच्यावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी नाट्यक्षेत्रातील मंडळीं बरोबर सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मंडळींनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या पक्षात पत्नी,वडील,भाऊ,दोन मुलगे आणि दोन विवाहित बहिणी असा आप्त परिवार आहे.



# कोविड-१९ प्रादुर्भावासंदर्भात पनवेल मनपा सज्ज

## ◆ आयुक्तांचे विशेष बैठकीद्वारे यंत्रणेला सतर्कतेचे आदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोविड-१९च्या वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्व संबंधित यंत्रणांनी सज्ज राहण्याचे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी दिले आहेत. या संदर्भात आयुक्त महोदयांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक संपन्न झाली त्यावेळी उपरोक्त निर्देश देण्यात आले.



या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, आरोग्य व स्वच्छता विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये आयुक्त चितळे यांनी कोविडसंदर्भातील सद्यस्थितीचा, उपलब्ध सोयी सुविधांचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी कोविड करिता सज्ज होण्यासाठी महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्यानुसार महानगरपालिकेने आपली तयारी पूर्ण केली आहे.

कोविड रुग्णांच्या विलगीकरणाकरिता वायएमटी कॉलेजच्या निमिशा रुग्णालयात १०० खाटाचे सीसीसी (CCC-Covid care center) विलगीकरण कक्ष उभारण्याची तयारी करण्यात आली आहे. तसेच कळंबोली डीसीएच येथे ३० ऑक्सिजन बेड व ६ आयसीयू बेड तयार ठेवण्यात आले आहेत. यामधील ऑक्सिजनचे सिलेंडर, पाईपलाईन यांची तपासणी तसेच सर्व उपकरणांची दुरुस्ती व पुर्नतपासणी आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार करण्यात आली.

उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे ५० खाटा आरक्षित करण्याबाबत व एमजीएम रुग्णालयामध्ये ५० खाटा आरक्षित ठेवण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. यानुसार संबंधित रुग्णालयांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. अशाप्रकारे किमान २०० ऑक्सिजन पुरवठा यंत्रणा असणाऱ्या खाटा सुसज्ज करण्यात आल्या आहेत.

पनवेल महापालिकेच्या मोल एक्स्पर्ट या आरटीपीसीआर लॅब मध्ये दररोज १ हजार ५०० आरटीपीसीआर चाचण्या करण्याची क्षमता असणारी यंत्रणा पूर्णपणे कार्यान्वित करण्यात आली आहे. याकरिता आवश्यक रसायने उपलब्ध करण्यात आली आहेत. कोविडचा प्रादुर्भाव वाढल्यास आवश्यक ट्रसिंग, व टेस्टिंगकरिता विशेष पथके तसेच डीसीएच, सीसीसी सेंटर येथे आवश्यक टेक्निकल मनुष्यबळ (डॉक्टर नर्सेस) इत्यादी तयार ठेवण्यात आले आहे.

रुग्णालयात आयसीयू व ऑक्सिजनचे पेशंट वाढल्यास ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या कंपनीसोबत देखील संपर्क करून मुबलक ऑक्सिजन पुरवठा होण्याबाबत दक्षता घेतली आहे.सीसीसी सेंटरकरिता आवश्यक रुग्णांचे जेवण, खाटा, अंथरुण, पांघरूण तसेच दैनिक वापराचे साहित्य उपलब्ध करण्याकरिता भांडार विभाग सुसज्ज ठेवण्यात आला आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील पालिकेच्या ५ ॲम्बुलन्स (BLS) तयार असून इतर २ -LS साठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच खाजगी म्बुलन्स सेवा, शासनाची १०४ म्बुलन्स यांचे नंबर पनवेल कनेक्ट या पालिकेच्या पवर प्रसारित करण्यात आले आहे जेणेकरून आपत्मकालीन परिस्थितीमध्ये रुग्ण ॲपद्वारे रुग्णवाहिकेशी तातडीने संपर्क साधू शकेल.

२४X७ कॉल सेंटर

पनवेल महापालिकेचे २४*७ कॉल सेंटर कार्यान्वित करण्याबाबत करण्यात आले आहे . पालिकेकडे असणारे ऑक्सिजनचे एल एम ओ व पीएसए प्लॅन्ट तपासणी करून तातडीने कार्यान्वित करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. खाजगी रुग्णालय व लॅब यांना कोविड रुग्णाबाबत तातडीने माहिती देण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

खागी रुग्णालय तसेच पालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आय एल आय व साथीच्या रुग्णांवर विशेष लक्ष ठेवण्याबाबत सूचना देण्यात आले आहेत तसेच क्षेत्रनिहाय कुठे साथीचे आजार बळावत असतील तर त्यावर विशेष लक्ष ठेवण्याबाबत सूचना आरोग्य कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत.

नवीन व्हेरियंटबाबत माहिती व आवश्यक उपाययोजनांबाबत उहापोह करण्याकरिता कोविड कार्य दलाच्या बैठकीचे आयोजन पुढील आठवड्यात करण्यात आले आहे. एकूणच सर्व पार्श्वभूमीवर सर्व प्रकारच्या दक्षता घेत आपली सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे.

### प्रशासनाची जय्यत तयारी

*पालिका क्षेत्रात आवश्यक धूर फवारणी, औषध फवारणी, स्वच्छताकरण्याकरिता प्रभागनिहाय विशेष पथके नेमली असून याकरिता आवश्यक सॅनिटायझर, हॅण्ड वॉश, सोडियम हायपोक्लोराईट इत्यादीसारखे साहित्यांची खरेदी करण्यात आली आहे.डीटीएच व सीसीसीमध्ये रुग्णांकरिता आवश्यक औषधसाठा तयार ठेवण्या बाबत आदेश दिले आहेत .पनवेल महापालिका क्षेत्रात पूर्वी 'कोविड रुग्णालय' म्हणून काम केलेल्या सर्व खाजगी रुग्णालयांशी संपर्क साधून इच्छुक कोविड समर्पित रुग्णालयांसाठीची माहिती मागविण्यात आली आहे तसेच आवश्यकता पडल्यास पूर्वीच्या कोविड लाटेतील कार्यरत रुग्णालयांना तातडीने सज्ज राहण्याबाबत सूचना देण्यात आले आहेत.*





पनवेल : डॉ. ऐशू फिजिओथेरपी क्लिनिकचे रविवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. या वेळी भाजप तालुका चिटणीस यतिन पाटील, जेष्ट कार्यकर्ते काका भगत आणि इतर मान्यवर उपस्थित होते.





पनवेल : देहरंग येथील सत्कर्मश्रद्धाश्रय यांच्या वतीने श्री गाढेश्वर बंधारा बांधण्यात आला आहे. या बंधाऱ्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचे मोलोच सहकार्य लाभले. त्या पार्श्वभूमीवर या बंधाऱ्याचा उद्घाटन सोहळा रविवारी आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बंधाऱ्याचे उद्घाटन झाले. तत्पूर्वी त्यांनी बंधाऱ्याची पाहणी करून आढावा घेतला. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी सरपंच राजेश भोईर, आश्रमाचे मोहन बापट, मालडुंगे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जोमा निरगुडा, काळुराम वाघ, वाहू चौधरी, गणपत वारगडा, सुनील वारगडा, चंदर भस्मा आदी उपस्थित होते.



पनवेल : आमदार महेश बालदी यांच्या विकास निधी अंतर्गत सवणे येथील तुळशीमाळ वाडीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन भाजप तालुका दक्षिण अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, विद्याधर जोशी, आपटा पं.स.अध्यक्ष संदीप पाटील, चावणे ग्रामपंचायत सदस्य परशुराम वाघ, ललिता दरवडा, सामाजिक कार्यकर्ते भगवान देशमुख, अनिल टकले आदी उपस्थित होते.

# खारघर, तळोजा वसाहतीत भटक्या कुत्र्यांचा उपद्रव; ९४ जणांना चावा

**पनवेल : वार्ताहर**

खारघर आणि तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. रस्त्यावरून पायी चालत जाणाऱ्या व्यक्तींवर मोकाट कुत्र्यांचा कळप हल्ला करीत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे वर्षभरात खारघर परिसरात ५४ जणांना तर तळोजा वसाहतीत ४० अशा ९४ जणांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद पालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्राप्त झाली आहे. पालिकेकडून मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण मोहीम राबवली जात असताना, खारघर-तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांच्या संख्येत वाढ होत असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

खारघर आणि तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर, गल्लीत टोळक्याने फिरणाऱ्या या कुत्र्यांमुळे लहान मुले, वृद्ध नागरिक तसेच दुचाकीवरून जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालिका प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यासाठी एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. निर्बीजीकरणामुळे कुत्र्यांची संख्या कमी होणे आवश्यक होते; मात्र त्यात वाढ होताना दिसून येत आहे. तळोजा वसाहतीत आजही कुत्र्यांची लहान लहान पिल्ले जागोजागी दिसून येतात. शहरातील वर्दळीच्या रस्त्यांवर भटक्या कुत्र्यांची टोळी खुले आम फिरत असल्याने शालेय विद्यार्थी, महिला, वृद्ध, व्यापारी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. दिवस-रात्र मोकाट कुत्री रस्त्यावर टोळीने फिरतात. अनेकदा ही कुत्री वाहनांच्या मागे भुंकत पळतात.

# गांजाचे सेवन केल्याबद्दल पनवेल तालुका पोलिसांनी केली कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये एक इसम गांजा हा अंमली पदार्थ सिगारेटच्या तंबाखूमध्ये मिक्स करून त्याचे सेवन करीत असताना आढळल्याने त्याच्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे.

आकाश शिवाजी भगत हे पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हे प्रकटीकरण पथकात कार्यरत आहेत. यावेळी पनवेल तालुका पोलिस ठाणे हद्दीत अवैध कृत्यांवर कारवाई करण्यासाठी वरिष्ठ पोलिस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या आदेशानुसार कुदळे, शिवाजी बाबर, आकाश भगत हे पनवेल तालुका पोलिस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना आजिवली, येथील जुना मुंबई-पुणे हायवे रोडच्या बाजूला हॉटेल मरीआईसमोर असलेल्या लोखंडी पाईपमध्ये एक इसम एका सिगारेटच्या तंबाखूमध्ये मिसळून सिगारेटमध्ये भरून जळत्या काडीने पेटवून त्याचे भुरके मारत असल्याचे दिसून आले.

यावेळी त्यांची अधिक चौकशी केली असता त्याने त्याचे नाव गणेश मनोज चव्हाण असून झोमॅटोमध्ये डिलीव्हरी बॉय म्हणून काम करीत असल्याचे सांगितले.

# अवैधरित्या अन्नधान्य विक्री

## पनवेल पुरवठा विभाग व तालुका पोलिसांची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील नेरेपाडा येथील एका घरामध्ये फोर्टीफाईड दाणे समाविष्ट असणारे सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वाटप होणाऱ्या तांदळाची व गव्हाची विक्री करण्यासाठी साठा केल्याचे आढळून आल्याने तहसीलदार पनवेल यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस व पुरवठा विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुध्द गिजे यांना मिळालेल्या माहितीनुसार पनवेल तालुका हद्दीतील नेरेपाडा गावात राहणारे चंद्रहास कडू यांच्या कडे अधिकृत परवाना नसताना ते राहत असलेल्या घरी अवैधरित्या अन्नधान्य विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार गिजे यांनी ही माहिती पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तहसीलदार यांना कळविली. पनवेल तहसीलदार व अप्पर तहसीलदार यांनी पनवेल पुरवठा विभागामधील पुरवठा निरीक्षक शिरीष शितोळे यांना कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार शितोळे यांनी मंडळ अधिकारी नेरे यांनाही या कारवाईसाठी सोबत घेतले.

या कारवाईमध्ये ४२ गोणी जप्त करण्यात आल्या असून त्या गोदामपाल, पनवेल शासकीय गोडावून पनवेलमध्ये सुरक्षित ठेवण्यात आल्या. यावेळी कडू यांच्यावर सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील वाटप होणारा साठा केल्याचे आढळून आल्याने अत्यावश्यक वस्तू अधिनियम अन्वये कारवाई केल्याची माहिती पनवेल शहर पोलिस ठाण्यात पुरवठा विभागाचे पुरवठा निरीक्षक शिरीष नंदकुमार शितोळे यांनी दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली आहे.

काही गोण्यांवर शासकीय पुरवठा विभागाचे स्टीकरत्यानुसार मंडळ अधिकारी नेरे एस.एस. पाटील चौकशी केली असता घरामध्ये विनापरवाना सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वाटप होणाऱ्या तांदळाची व गव्हाची विक्री करण्यासाठी आणलेला साठा केले असल्याचे आढळून आले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनातर्फे दिनांक २१ मे ते ३१ मे २०२५दरम्यान राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल तालुका दक्षिण मंडळतर्फे मंदिरे, घाट स्वच्छता, वेदपठण व महाआरती या पवित्र आणि भक्तिभावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन 'श्री क्षेत्र गुळसुंदे' येथील 'श्री शिवमंदिर' येथे करण्यात आले.





या कार्यक्रमास पनवेल तालुका दक्षिण भाजपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, जिल्हा परिषद गुळसुंदे अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, गुळसुंदे ग्रामपंचायत सदस्य रमेश मालसुरे, सतिश साठे, माजी उपसरपंच प्रकाश गाताडे, माजी सदस्य मनोज पवार, गुळसुंदे युवा मोर्चा उपाध्यक्ष प्रतिक भोईर, ज्ञानेश्वर भोईर, आदिवासी संघटना अध्यक्ष बंडू शिंदे, शक्तीकेंद्र प्रमुख प्रशांत पाटील, गुळसुंदे बूथ अध्यक्ष अजिंक्य सुर्वे, हर्षल जोशी, रूपेश चव्हाण, सुरेश जोशी, जितू गाताडे, अशोक मालसुरे, प्रकाश शेडगे, पोसरी माजी उपसरपंच कमलाकर शिंदे, तुराडे माजी उपसरपंच हर्षल पाठोर, गोपाळ पाटील, जाताडे सरपंच रोहिदास तोंडे, दीपक पारंगे, सहिल दळवी, गणेश पडेडकर, ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र पाटील इत्यादी उपस्थित होते.

# उरण तालुका अपघात निवारण समितीची बैठक

## प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील रस्ते अपघात, वाहतूक कोंडी,सर्विस रोड-महामार्गावरील अनधिकृत पार्किंग, पायाभूत सूविधा इ. बाबत उरण तालुका अपघात निवारण समिती तर्फे जेएनपीए कॉन्फरन्स हॉल येथे बैठकिचे आयोजन केले होते. उरण मधील विविध सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन उरण तालुका अपघात निवारण समिती स्थापन केली आहे.



या समितीच्या माध्यमातून अपघात, वाहतूक कोंडी, प्रवाशांच्या समस्या, नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर आवाज उठविला जात आहे.

उरणमध्ये आयोजित केलेल्या सदर बैठकिस जेएनपीएचे दोन्ही विश्वस्त दिनेश पाटील आणि रवि पाटील, माजी विश्वस्त भूषण पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील, गोपाल पाटील, जेएनपीएचे मुख्य व्यवस्थापक (वाहतूक) डॉ थॉमस, प्रशासकीय अधिकारी एस.के.कुलकर्णी आणि डीपी वर्ल्ड, जीटीआय, पीएसए (सिंगापूर), एनएसएफटी(जेएम बक्षी) या पोर्टचे अधिकारी, तिन्ही वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

ट्रेलर कंटेनर रस्त्यात बंद पडले किंवा अपघात झाल्यास वाहने उचलण्यासाठी जेएनपीएने दोन हैड्रा/टोइंग वाहने तातडीने उपलब्ध करावीत. चारही बंदरातील ट्रफिक विभागाने बाहेर पडणाऱ्या आपापल्या ट्रेलर-कंटेनरवर नियंत्रण ठेवावे, त्यासाठी फिरत्या वाहनांचा वापर करावा असे ठरले.

## तळोजातून एकजण बेपत्ता

**पनवेल** : तळोजा एमआयडीसी येथे काम करत असलेल्या ठिकाणावरून कोणास काही एक न सांगता एक इसम कोठेतरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .



उमेशसिंग गयासिंग ठाकूर ( ५५ ) असे या इसमाचे नाव असून रंग गोरा ,उंची ५. ५ इंच , अंगाने सडपातळ ,केस काळे सफेद बारीक ,नाक सरळ ,डोळे काळे ,चेहरा लांबट ,मिशी जाड असून अंगात चॉकलेटी फुल शर्ट ,काळ्या रंगाची फुल पँट व काळ्या रंगाचे शूज घातले आहेत .

## संपादकीय

# मान्सूनची दस्तक

केरळमध्ये शनिवारी दाखल झालेल्या मान्सूनने अवघ्या काही तासांमध्ये महाराष्ट्रात दस्तक दिली. सतत पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे मान्सूनचे तितके औत्सुक्य राहिले नसले तरी या नैऋत्य मोसमी पावसाचे महत्त्व शेतकऱ्यांसह समस्त नागरिकांसाठी अनन्यसाधारण असेच आहे.

**नैऋत्य मान्सून भारतात केरळमार्गे दाखल होतो आणि तिथून पुढे महाराष्ट्रात कोकण, गोवा, मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या भागांत पसरतो. या वर्षी मान्सूनने वेळेआधीच हजेरी लावली. भारतीय हवामान विभागाने यंदा सरासरीच्या जवळपास मान्सून राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. जून महिन्याच्या सुरुवातीस पावसाची तीव्रता मध्यम ते जोरदार असून पुढील काही दिवसांत महाराष्ट्रातील बहुतांश भागांत पावसाचा जोर वाढेल, असा अंदाज आहे. महाराष्ट्रातील सुमारे ८०% शेती ही पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे मान्सूनचे आगमन म्हणजे शेतकऱ्यांसाठी समाधानाची बाब आहे. जून महिन्यात भात, सोयाबीन, बाजरी, तूर, मका अशा खरीप हंगामातील पिकांची पेरणी केली जाते. पावसाची योग्य वेळ आणि प्रमाण यामुळे पेरणी योग्य वेळी होण्यास मदत होते आणि उत्पादनात वाढ होते. हवामान संशोधन संस्थांनी सूचित केले आहे की, या वर्षी अल नीनो प्रभाव कमजोर होतो आहे आणि ला नीनाचे लक्षण दिसत आहेत. यामुळे भारतात पावसाचे प्रमाण सामान्य ते थोडक्याशा जास्त श्रेणीत राहण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती शेतीस अनुकूल ठरू शकते. पश्चिम भारत: महाराष्ट्र, गुजरात, आणि गोव्यात सुरुवातीस काही प्रमाणात कमी पाऊस पडू शकतो, पण जुलै–ऑगस्टमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. मराठवाडा व विदर्भात पावसाची नियमितता अधिक असण्याचा अंदाज आहे, जे या भागांसाठी सकारात्मक संकेत आहेत. उत्तर भारतात पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, आणि बिहारमध्ये मान्सूनचा प्रभाव जुलै महिन्यात अधिक जाणवेल. विशेषतः उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात अतिवृष्टीची शक्यता असून, डोंगराळ भागात भूस्खलनासारख्या घटनांची शक्यता नाकारता येत नाही. दक्षिण भारतात केरळ, कर्नाटका, तामिळनाडू व आंध्रप्रदेशात जूनच्या सुरुवातीपासूनच चांगला पाऊस होईल असा अंदाज आहे. विशेषतः पश्चिम घाटाच्या परिसरात सरासरीपेक्षा अधिक पावसाचे संकेत आहेत. पूर्व भारत आणि ईशान्य राज्यांमध्ये आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश यांसारख्या राज्यांमध्ये प्रचंड पावसाची शक्यता आहे. या भागात नेहमीच मान्सून सक्रिय असतो आणि यंदाही अतिवृष्टीमुळे पुराचा धोका वाढू शकतो. या वर्षीचा मान्सून सामान्य ते सरासरीच्या जवळ असेल, असा एकंदर अंदाज आहे. हवामान बदलाचे परिणाम लक्षात घेता स्थानिक पातळीवर वेळोवेळी बदलणाऱ्या हवामानाच्या स्थितीकडे बारकाईने लक्ष ठेवणे गरजेचे आहे. शेती, पाणी व्यवस्थापन आणि आपत्ती नियंत्रण विभागांनी योग्य ती तयारी ठेवणे आवश्यक आहे. मान्सूनचा अंदाज हा केवळ मार्गदर्शक असतो. प्रत्यक्षात किती व कसा पाऊस पडतो हे काही प्रमाणात निसर्गाच्या स्वभावावरही अवलंबून असते. म्हणूनच जागरूकता आणि पूर्वतयारी ही यशस्वी मान्सूनसाठी अत्यावश्यक आहे. मान्सून दाखल झाल्यामुळे गंभीर उन्हाळा टळू शकतो; त्याचबरोबर जलसाठ्यांमध्ये पाणी लवकर भरले जाण्याची शक्यता आहे. लवकर आगमनामुळे शेतीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे, ज्यामुळे खरीप हंगामासाठी योग्य वेळेत लागवड होऊ शकते.**

# कर्जत तालुका होतोय शैक्षणिक गुणवत्तेत अव्वल

**खबरबात**
विजय मांडे

कर्जत तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमधून प्राथमिक शिक्षण मिळत होते, मात्र माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध नसल्याने मोठी पंचाईत होत होती. भाषाप्रभू राम गणेश गडकरीसुद्धा कर्जत शहरातील प्राथमिक शाळेत शिकले, परंतु त्यांच्याकडे त्या वेळी फी भरायला पैसे नव्हते म्हणून त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आल्याची नोंद आजही त्या शाळेत पहायला मिळते. त्या वेळी थोरा–मोठ्यांची मुले मुंबई पुण्याला जाऊन शिक्षण घेत असत. आता कर्जत म्हणजे बटाटावडा, धबधबे, फार्म हाऊस, रिसॉर्ट याच्याबरोबरच शैक्षणिक सुविधेतदेखील अग्रेसर झाला आहे. अनेक संस्थांनी तालुक्यात उच्च शिक्षणाची दालने उघडून कर्जत 'शिक्षणाची पंढरी' म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातील विद्यार्थ्यांची विशेषतः मुलींची गुणवत्ता वाढत चालली आहे.

दादासाहेब पाध्ये, उकिडवे, नाना कोकजे आदींना शिक्षणाचे महत्त्व पटल्याने त्यांनी १९३५ साली अभिनव ज्ञानमंदिर संस्थेची स्थापना करून तालुक्यात पहिली माध्यमिक शाळा सुरू केली. त्यानंतर काही दानशुरांनी आपल्या जमिनी दिल्यामुळे शाळा उभारणीच्या जागेचा प्रश्न सुटला. संस्था उभारणीसाठी दत्तो वामन पोतदार यांनी अथक प्रयत्न केले. त्यानंतर शाळांचा विस्तार तालुक्यात वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेने गौळवाडी, कडाव, माथेरान येथे शाळा सुरू करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. संस्थेने कर्जत तालुक्याबरोबरच ठाणे जिल्ह्यातील वांगणी येथे शाळा सुरू करून तेथील विद्यार्थ्यांनासुद्धा शिक्षणाची दालने उघडून दिली. काही कारणाने माथेरानमधील शाळा बंद करावी लागली. संस्थेच्या उभारणीसाठी रामभाऊ गडकरी, दामू अण्णा आठवले यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. संस्थेने कर्जत, गौळवाडी आणि वांगणी येथे कनिष्ठ महाविद्यालये सुरु केली व विशेषतः तालुक्यातील मुलींची शिक्षणाची गैरसोय दूर केली तसेच शिशुमंदिर, शारदामंदिराच्या माध्यमातून चिमुकल्यांच्या शिक्षणाचीही सोय करून दिली.

आदिवासी ग्रामीण भागात शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून भाऊसाहेब राऊत यांनी आदिजन विद्या प्रसारक मंडळ स्थापन करून कशेळे येथे माध्यमिक विद्यालय सुरू केले. त्यानंतर डिकसळ–चिंचवली येथेही माध्यमिक विद्यालय सुरु करून त्या भागातील विद्यार्थ्यांच्या दारात शिक्षण उपलब्ध करून दिले. त्यांचे पुत्र मनोहर राऊत या संस्थेची जबाबदारी अगदी नव्वदी जवळ जात असतानाही सांभाळत होते. त्यांनी या दोन्ही ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालये व शिशुमंदिर शाळा सुरू केली. इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळावे म्हणून ॲड. दत्तात्रय पेठे, डॉ. विजया पेठे, शांतीलाल परमार, रमेश पिंपरे आदींनी कर्जत एज्युकेशन सोसायटी स्थापन करून इंग्रजी माध्यमाचे चांगल्या दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून दिले. या शाळेचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागत आलेला आहे. ही संस्था या वर्षी पन्नास वर्षांची होत आहे. या संस्थेने कडाव येथेही इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करून ग्रामीण भागातसुद्धा इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची सोय केली आहे. महिला मंडळ संचालित विद्या विकास मंदिर गेल्या अनेक वर्षांपासून गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. लीलाताई दिवाडकर या अनेक वर्ष महिला मंडळाच्या अध्यक्षपदी होत्या. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने शाळा चालवीत आहेत. दहिवली येथील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे जनता विद्यामंदिर, गौरकामत येथील स्वामी विवेकानंद विद्यालय, खांडपे येथील ज्ञान मकरंद विद्यालय, स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय डोंबे विद्यानिकेतन आदी शाळांमधून विद्यादानाचे काम करीत आहेत. खांडपे येथे सुधाकर घारे यांनी गीता घारे फाउंडेशन संस्था व इंग्लिश व सेमी इंग्लिश शाळा सुरू करून वासराच्या खोंड्यात इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचे दरवाजे उघडले आहेत. पोसरी येथेसुद्धा सुंदर इंग्लिश मीडियम स्कूल सुरू केले आहे. गुड शेफर्ड कॉन्व्हेंट स्कूल, डॉन बास्को स्कूल, कोकण ज्ञानपीठ, सरस्वती एज्युकेशन सोसायटी, जी. व्ही. आचार्य इन्स्टिट्यूट, दिलकॅप कॉलेज ॲण्ड इन्स्टिट्यूट, ॲंग्लो इस्टर्न मरीटाईम काडमी, युनिव्हर्सल बिझनेस स्कूल आदी संस्थांनीसुद्धा कर्जतमध्ये उच्च शिक्षणाची विविध दालने उघडून दिली आहेत.

माथेरानमध्ये सरस्वती विद्यालयाच्या माध्यमातून बाबासाहेब गव्हाणकर यांनी शिक्षणाची व्यवस्था केली आहे. नेरळमध्ये नेरळ विद्यामंदिर, नेरळ कनिष्ठ महाविद्यालय, मातोश्री सुमती टिपणीस महाविद्यालय, विद्या विकास मंदिर, विद्याविकास कनिष्ठ महाविद्यालय, नेरळमधील हाजी लियाकत इंग्लिश मीडियम स्कूल सुरू करण्यात आली आहेत. भरत भगत, रघुनाथ धुळे आदींनीसुद्धा कर्जत तालुक्यात शैक्षणिक व्यवस्थेसाठी योगदान दिले आहे. यंदा दहाव्या इयत्तेत तालुक्यात पहिल्या तीन क्रमांकावर येण्याचा बहुमान या नवीन शाळेले मिळविला आहे. तालुक्याच्या ग्रामीण व आदिवासी भागातसुद्धा शिक्षणाची गंगा पोहोचली आहे.

उच्च शिक्षणासाठी अनेक संस्थांनी इंजिनिअरिंग, फार्मसी महाविद्यालये सुरु करून उच्च शिक्षण आपल्या दारी आणले आहे. देशभरातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये सीबीएसई दर्जाचे शिक्षण सुरू करण्यात येणार आहे. मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या माध्यमातून केंद्र सरकारने घोषणा केली आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या कर्जत तालुक्यातील कळंब येथील शाळेत हे शिक्षण सुरू झाले आहे. ३५ मुलांनी पहिल्या इयत्तेत प्रवेश घेतला असून त्या सर्व विद्यार्थ्यांचा प्रवेश सोहळा पालक आणि शिक्षक तसेच ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत साजरा झाला. त्यामुळे भविष्यात तालुक्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल.

कर्जतमध्ये १९७५ सालापर्यंत केवळ अकरावीपर्यंतचे शिक्षण होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने अकरावी शालांत परीक्षा रद्द करून दहावी शालांत परीक्षा सुरू केली, मात्र येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी पूर्वीसारखेच कल्याण, मुंबई, पुणे, उल्हासनगर, खोपोली आदी ठिकाणी जावे लागत असे. मुलांचे ठीक होते, परंतु मुलींना शिक्षणासाठी बाहेरगावी पाठविण्याची मानसिकता पालकांची नव्हती. उलट दहावी किंवा अकरावी झाली नंतर लगेचच मुलींचे हात पिवळे करण्याकडे पालकांचा कल असायचा. त्याला त्यावेळची परिस्थितीसुद्धा काही अंशी कारणीभूत होती

राज्याचे उच्च शिक्षणमंत्री असलेल्या अप्पासाहेब धारकरांनी नेमक्या यावेळीच या भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून १९८९ साली कोकण ज्ञानपीठ संस्थेची स्थापना केली आणि पदवीपर्यंतचे शिक्षण कर्जतमध्ये आणले. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेचे शिक्षण सुरू झाल्याने विशेष करून तालुक्यातील मुलींच्या शिक्षणातला अडसर दूर झाला. उरण तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी तेथे कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू करून शिक्षणाची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अप्पासाहेबांनी एकोणीस वर्षांपूर्वी अभियांत्रिकी महाविद्यालय सहकार नगरच्या गोडाऊनमध्ये सुरू केले. हे महाविद्यालय आता स्वत:च्या सुमारे पस्तीस एकर जागेमध्ये मोठ्या डौलाने उभे आहे. या महाविद्यालयाचे विद्यार्थी महाविद्यालय सुरू झाल्यापासून दरवर्षी मुंबई विद्यापीठाच्या यादीत अगदी प्रथम तीन क्रमांकामध्ये चमकतात. २००७ साली शिक्षणाची आवश्यकता ओळखून त्यांनी आपल्या दिवंगत मुलाच्या नावाने राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय सुरू केले आणि त्या महाविद्यालयाचे विद्यार्थीसुद्धा मुंबई विद्यापीठाच्या यादीत चमकू लागले आहेत. आता या महाविद्यालयात फार्मसी डिप्लोमा, डिग्री, एम फार्म पर्यंत शिक्षण घेता येते.

अप्पासाहेबांच्या या योगदानामुळे कर्जतकरांचा शैक्षणिक विकास झालाच, शिवाय अनेकांना रोजीरोटी मिळाली. अप्पासाहेबांचे सहा वर्षांपूर्वी निधन झाले. त्यानंतर काही घटनांमुळे अनेक कटू प्रसंगांशी संस्थेला सामना करावा लागला, परंतु त्याचा परिणाम महाविद्यालायांवर कधीच झाला नाही. शैक्षणिक कार्य अखंडित पणे सुरू आहे.

डॉ. नंदकुमार तासगावकर यांनी सरस्वती एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून इंजिनिअरिंग, फार्मसी, एमबीए आदी महाविद्यालये सुरु करून केली. विशेष म्हणजे रायगड हॉस्पिटल सुरू करून वैद्यकीय महाविद्यालयही सुरू केले. त्यांनी कर्जतकरांच्या आरोग्याची काळजीसुद्धा घेतली आहे. काही दिवसातच वैद्यकीय महाविद्यालय सुरू करून या परिसरातील विद्यार्थ्यांना डॉक्टर बनविण्याच्या प्रयत्नातही ते आहेत. डॉ. तासगावकरांनी पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय २००३ साली कर्जत तालुक्यातील चांदई गावाच्या परिसरात सुरु केले. त्यानंतर अवघ्या नऊ–दहा वर्षात त्यांनी दहा महाविद्यालये सुरु करून कर्जतकरांना शिक्षणाची सोय करून कर्जतची वाटचाल शिक्षण पंढरी कडे नेऊन कर्जत 'एज्युकेशनल हब' म्हणून ओळखण्यास योगदान दिले. डॉ. तासगावकरांनी या परिसरात शैक्षणिक संकुल उभारून अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला त्यामुळे या परिसरातील ग्रामस्थांची आर्थिक पातळी उंचावत आहे. त्यांनी या परिसरातील डिकसळजवळ वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा संकल्प सोडला. त्या वेळी त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, परंतु त्यांनी त्यातूनही मार्गक्रमण करून रायगड हॉस्पिटल सुरु करून कर्जतकरांचे आरोग्य जपण्याचा प्रयत्न केला आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### सेल्फी काढल्यावर मागील अक्षरं उलटी दिसतात का?

तुम्ही सेल्फी काढला की तुमच्या सेल्फीमधील मागचे अक्षरं हे उलटी का दिसतात? याविषयी तुम्हाला माहिती आहे का? नसेल माहिती तर चिंता करू नका. आज आम्ही तुम्हाला याचे कारण सांगणार आहोत तसेच मागचे अक्षरं पुन्हा सरळ कसे दिसतील, याची नेमकी काय सेटिंग करावी लागेल



याचीदेखील माहिती देणार आहोत, चला तर मग जाणून घेऊया. त्यासाठी आधी एक उदाहरण बघूया.

सेल्फीमध्ये लिहिलेल्या सर्व गोष्टी उलट्या दिसतात, पण टेन्शन घेण्याची गरज नाही. आज आम्ही तुम्हाला अशी ट्रिक सांगणार आहोत, ज्यामुळे आतापर्यंत उलटे दिसत असलेले सर्व शब्द योग्य आणि सरळ लिहिलेले दिसतील.

मग तो अँड्रॉइड फोन असो किंवा ॲपल iOS. तुम्ही परफेक्ट लूक सेल्फी घेऊ शकता किंवा दोन्हीमध्ये सेल्फी व्हिडीओ रेकॉर्ड करू शकता. यासाठी तुम्हाला तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये थोडा बदल करावा लागेल. या सेटिंगनंतर जेव्हा तुम्ही एखादा व्हिडीओ किंवा फोटो काढाल तेव्हा तुमच्या मागे लिहिलेले सर्व शब्द थेट दिसतील.

**आयफोन युजर्ससाठी 'ही' सेटिंग करा**

फोनच्या सेटिंगमध्ये जा. खाली कॅमेऱ्यावर स्क्रोल करा. मिरर फ्रंट कॅमेरा किंवा मिरर फ्रंट फोटोजचा पर्याय असेल, तो बंद करा. आता सेल्फी बरोबर येईल. सर्व काही सरळ दिसेल, उलटे नाही.

**अँड्रॉइड युजर्ससाठी 'ही' सेटिंग करा**

कॅमेरा ॲप उघडा. सेल्फी मोडमध्ये सेटिंग्ज शोधा. मिरर सेल्फी, फ्लिप सेल्फी किंवा सेव्ह ॲज प्रिव्ह्यूसारखे पर्याय असतील. तो पर्याय बंद करा. लॅपटॉप किंवा संगणकावरील उपाय (वेबकॅम)


**काही महत्त्वाच्या सामान्य टिप्स**

अनेकदा कॅमेरा प्रिव्ह्यूमध्ये फोटो उलटा दिसतो, पण सेव्ह बरोबर असतो. त्यामुळे सेव्ह केलेला फोटो एकदा पाहणं गरजेचं आहे.

मिररचा पर्याय नसेल तर स्नॅपसीड, पिक्सआर्ट, फोटोशॉप अशा ॲप्सद्वारे फोटो फ्लिप करू शकता.

तुम्ही ओपन कॅमेरा (अँड्रॉइड) किंवा प्रोकॅमेरा (ळजड) सारख्या थर्ड पार्टी ॲप्सचा वापर करू शकता.

# नाटककार राम गणेश गडकरी



**निमित्त**

राम गणेश गडकरी यांचा आज जन्मदिन. (२६ मे १८८५–२३ जानेवारी १९१९). गडकरी हे श्रेष्ठ नाटककार, विनोदकार आणि कवी होते. त्यांनी कवितालेखन 'गोविंदग्रज' या नावाने केले. विनोद लेखन 'बाळकराम' या नावाने केले. जन्म गुजरात राज्यातील नवसारी येथे झाला.

शिक्षण दामनगर (सौराष्ट्र), कर्जत आणि पुणे येथे महाविद्यालयीन पहिल्या वर्षापर्यंत (१९१२) झाले. त्यापूर्वी काही काळ त्यांनी किर्लोस्कर नाटक कंपनीच्या नाटकांत कामे करणार्या मुलांचे मास्तर म्हणून काम केले. तेथे काही मतभेद झाल्यानंतर विदर्भातील बाळापूर या गावी ते काही दिवस शिक्षक होते. पुण्याच्या ज्ञानप्रकाशात काही काळ उपसंपादकाची नोकरी केली (१९०९–१०) तसेच पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाचे काम केले. १९१०मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीशी नाटकासाठी पदे रचण्याच्या निमित्ताने त्यांचा पुन्हा एकदा संबंध आला. त्यानंतर त्यांनी सर्वस्वी लेखानावरच आपला चरितार्थ चालविला.

वयाच्या सतराव्या वर्षी लिहिलेले मित्रप्रीती हे त्यांचे पहिले नाटक अनुपलब्ध आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या नाटकांचा आणि विनोदी लेखनाचा प्रभाव त्यांच्यांवर संस्कारक्षम वयातच पडला. नाट्यविनोदाच्या संदर्भात ते श्रीपाद कृष्णांना आपले गुरू मानीत असत. त्यांचे पहिले पुस्तक कोल्हटकरांच्या नाटकांतील उताऱ्यांचे आहे (१९०७). वेड्यांचा बाजार (लेखनकाळ १९०६–०७) हे त्यांचे अपूर्ण नाटक महाराष्ट्रातील एक विख्यात नट आणि गडकऱ्यांचे एक निकटचे मित्र चिंतामणराव कोल्हटकर यांनी पूर्ण केले व ते १९२३मध्ये प्रकाशित झाले.

काव्यलेखानाच्या बाबतीत ते स्वतःस केशवसुतांचे 'कट्टे चेले' म्हणवीत. त्यांच्या काव्याची प्रकृती मात्र केशवसुतांच्या काव्याहून भिन्न आहे. 'अल्लड प्रेमास' (१९०९) ही गडकरींची प्रसिद्ध झालेली पहिली कविता. मासिक मनोरंजनात ती प्रसिद्ध झाली. ह्याच मासिकातून १९१३–१५मध्ये त्यांचे विनोदी लेख प्रसिद्ध झाले. हे लेख पुढे रिकामपणाची कामगिरी (१९२१) या नावाने प्रसिद्ध झाले. रंगभूमी या मासिकात 'सवाई नाटकी' या टोपण नावाने आणि कधीकधी निनावी लेखन गडकरी करीत असत.

प्रेमसंन्यास (१९१३) हे त्यांचे रंगभूमीवर आलेले पहिले नाटक. त्यानंतरची त्यांची नाटके अशी : पुण्यप्रभाव (१९१७), एकच प्याला (१९१९), भावबंधन (१९२०) व राजसंन्यास (१९२२, अपूर्ण). वाग्वैजयंती (१९२१) ह्या नावाने त्यांच्या कविता संगृहीत केलेल्या आहेत. त्यांचे समग्र विनोदी लेख संपूर्ण बाळकराम (१९२५) या नावाने प्रसिद्ध झाले. याशिवाय गडकरींचे बराच काळ अप्रकाशित राहिलेले साहित्य अप्रकाशित गडकरी (१९६२) या नावाने प्रल्हाद केशव अत्रे यांनी संपादित केले आहे. गडकऱ्यांच्या लेखनसंकल्पांची त्यावरून कल्पना येते. मृत्यूसमयी ते विदर्भातील सावनेर या गावी होते. ते क्षयाने आजारी होते. वयाच्या ३४व्या वर्षी त्यांचे निधन झाले. भावबंधन या नाटकाचा अखेरचा प्रवेश लिहिल्यानंतर थोड्या वेळाने त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. गडकरींचे साहित्य अल्प असले तरी मराठी मनावरील त्यांचा प्रभाव मात्र अपूर्व असून तो त्यांच्या मृत्यूनंतरही टिकून आहे. त्यांच्या कवितेत भावोत्कटता व कल्पनाचमत्कृती यांचा एकाच वेळी प्रत्यय येतो.

(साभार : मायमहानगर)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### 'हे' पदार्थ लोहाची कमतरता करतात दूर

आजकाल प्रत्येकजण कोणत्या न कोणत्या आरोग्याच्या समस्यांना तोंड देत आहे. त्यात बदलत्या जीवनशैलीमुळे आपल्या आरोग्यावर परिणाम होऊ लागला आहे. अशातच आपल्या शरीरात पोषक तत्वांची कमतरता जाणवू लागली की आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. जर तुम्हालाही थकवा जाणवत असेल आणि कोणतेही काम करण्याची इच्छा नसेल, तर त्याचे कारण तुमच्या शरीरात रक्ताची कमतरता असू शकते. ही समस्या बहुतेकदा महिला आणि शाकाहारी आहार घेणाऱ्या लोकांमध्ये आढळते. आता अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या आहारात काही



लोहयुक्त पदार्थ समाविष्ट करू शकता जे तुमचे शरीर तंदुरुस्त ठेवण्यास मदत करतील आणि लोहाची कमतरता दूर करतील.

लोह फक्त मांस किंवा माशांमध्येच आढळत नाही, तर शाकाहारी आहार घेणाऱ्या लोकांकडे त्यांच्या शरीरातील लोहाची कमतरता दूर करण्यासाठी त्यांच्या आहारात अनेक पर्याय समाविष्ट आहेत.

डार्क चॉकलेट केवळ तुमची भूक भागवत नाही, तर तुमचा मूड फ्रेश करण्यासदेखील मदत करते. खरंतर डार्क चॉकलेट शरीरात लोह वाढवण्यास मदत करते. डार्क चॉकलेटच्या एका पॅकेटमध्ये ३.३ मेगाग्रॅमपर्यंत लोह असते, जे तुमच्या शरीरातील लोहाची कमतरता दूर करण्यास मदत करते.

पालक ही पालेभाजी लोहयुक्त अन्न आहे. एक वाटी पालकामध्ये ६.४ मेगाग्राम लोह असते, जे महिलांमधील अशक्तपणा दूर करण्यास मदत करते. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही पालकाला तुमच्या आहाराचा अनेक प्रकारे भाग बनवू शकता. डाळींमध्ये लोहाचे प्रमाण चांगले असते. एक वाटी मसूरमध्ये ६.६ मेगाग्रॅम लोह असते. यात सर्वात चांगली गोष्ट म्हणजे डाळी तुमच्या आहाराचा एक भाग आहेत आणि त्या स्वस्त दरातदेखील उपलब्ध आहेत.

एक वाटी चण्यामध्ये सुमारे ४.७ मेगाग्रॅम लोह असते. तुम्ही ते भाजी, सॅलड किंवा स्नॅक म्हणून खाऊ शकता. शरीरातील लोहाची कमतरता दूर करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे.

टोफू हा शाकाहारी लोकांचा आवडता पदार्थ आहे. अर्ध्या वाटी टोफूमध्ये ३.४ मेगाग्रॅम लोह असते. लोहासोबतच त्यात प्रथिने आणि कॅल्शियमदेखील चांगल्या प्रमाणात असते. हे तुमचे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते.

(या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत.)

# कडाव महसूल मंडळ येथे शासकीय योजना जनतेच्या दारात!

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील महसूल मंडळ कडाव येथे महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर ग्रामस्तरावर घेण्यात आले असून शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिलांसारख्या सामान्य नागरिकांना विविध शासकीय सेवा आणि योजना थेट गावातच मिळाव्यात. शासकीय सेवा योजना यांचा प्रचार, प्रसार यासाठी प्रयत्न करण्यात आले.

मार्केवाडी येथील मयुरेश मंगल कार्यालयाच्या सभागृहात आयोजित



शिबीराचे उदघाट्न उप विभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, तालुका कृषी अधिकारी हेमांगी सकपाळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर रमेश कोकरे, कडावच्या वैद्यकीय अधिकारी ऋतुजा पाटील, कडाव ग्रामपंचायत सरपंच करूणा पवार आदी उपस्थित होते. मंडल अधिकारी संतोष जांभळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

या शिबिरात जातीचे दाखले, उत्पन्न दाखले, प्रलंबित फेरफार,जिवंत ७/१२ मोहीम अंतर्गत वारस नोंदी फेरफार वाटप, शेतकऱ्यांना बी-बियाणे वाटप, किसान कार्ड, नवीन मतदार नोंदणी व दुरुस्ती, संजय गांधी निराधार योजना अंतर्गत अर्थ सहाय्य वितरण, किसान कार्ड तसेच वैद्यकीय तपासणी यांचा समावेश होता. या उपक्रमात एकूण १००८ नागरिकांनी अर्ज दाखल केले तर ७६३ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला.

याप्रसंगी प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी,'या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांना थेट फायदा होत आहे. शासनाचा हा खरोखरच सुंदर उपक्रम असून याचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा.' असे आवाहन केले. डॉ. धनंजय जाधव यांनी सांगितले की, या शिबिरामार्फत गोरगरीब, सर्वसामान्य जनता, विद्यार्थी, शेतकरी यांना शासकीय योजना थेट पोहोचवत आहोत. जनतेचे दैनंदिनी प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम व गतिमान करण्याचा शासनाचा मानस असल्याने कर्जत तालुक्यात प्रत्येक महसुली मंडळात समाधान शिबिराचे आयोजन केले आहे

## नदी, ओढ्यावरील अनधिकृत बांधकामे थांबवा

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात दिवसेंदिवस नवनवीन प्रकल्प, उद्योग, फार्महाऊस निर्माण होत आहेत. या वेगवेगळ्या नव्या प्रकल्प उभारणी दरम्यान स्थानिक, भूमिपुत्र व शेतकरी पशुपालक यांची बडे बडे उद्योजक, व्यवसायिक, विकासक, भांडवलदार यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर मुस्कुटदाबी होत असल्याच्या तक्रारीत देखील वाढ होत आहे. वऱ्हाड जांभूळ पाडा (बौद्धवाडी)गावाकडे येणाऱ्या जाणाऱ्या मुख्य रहदारी व वर्दळीच्या असलेल्या नदी ओढ्यावरील पुलालगत व ओढ्यातच होरीझेन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने बांधकामे सुरू केली असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या बांधकामाविरोधात वऱ्हाड जांभूळपाडा (बौद्धवाडी) ग्रामस्थांनी आक्रमक होत नदी ओढ्यातील बांधकामे त्वरित थांबवण्याची मागणी केली आहे. सदरची बांधकामे थांबवली नाहीत तर ग्रामस्थ या कंपनी विरोधात आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा पाली सुधागड तहसीलदार व पाटबंधारे विभाग कोलाड रायगड यांना निवेदनाद्वारे दिला आहे. तसेच येत्या काळात आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आम्ही उग्र जन आंदोलन देखील छेडू असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

वऱ्हाड बौद्धवाडी यांचा पूर्वापार असलेला वहीवाटीचा रस्ता तसेच जनावरांचे पाणी पिण्याचे स्रोत या नव्या प्रकल्प निर्मितीत नष्ट झाले आहेत व अजूनही नष्ट होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. नदी ओढे व पूर्वापार जलसाठे राखून ठेवणे बंधनकारक असताना राजरोसपणे ओढ्यातच बांधकामे केली जात आहेत. आम्ही जांभुळ पाडा ग्रामस्थ हे पूरग्रस्त असून १९८९ व २००५ या वर्षी महापुराचा मोठा फटका बसून मोठी जीवित हानी व वित्तहानी झाली होती. अशाप्रकारे नदि नाले ओढे यामध्ये बांधकामे केल्याने पुराचे पाणी थेट घरात शिरण्याची भीती वाढली आहे, याबरोबरच शेती व गुरांचे देखील नुकसान होणार आहे. भविष्यात गावाला पुराच्या पाण्याचा धोका ओढवणार असल्याने प्रशासनाने त्वरित यावर योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी ग्रामस्थ नितेश पवार व ग्रामस्थांनी केली आहे.यावेळी बोलताना संतोष साळुंके म्हणाले की सदरचा प्रकल्प आमच्या गावाला व शेतीला लागून होत आहे

दरम्यान या संदर्भात पाली सुधागड तहसीलदार व पाटबंधारे विभाग कोलाड रायगड काय भूमिका घेतात? याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.



## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दीनिमित्त रोह्यात स्वच्छता, निबंध स्पर्धेची मोहीम राबवणार

**धाटाव : प्रतिनिधी**

२०२५ हे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीचे ३०० वे वर्ष असून , प्रेरणादायी व ऐतिहासिक वर्षाचे औचित्य साधून रोहा तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर आधारित विविध ठिकाणी निबंध स्पर्धा , रोहे शहरातील सर्वच प्रभागात स्वच्छता मोहीम, त्यांचे ज्या ज्या ठिकाणी अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक आहेत त्या स्मारकाच्या ठिकाणी स्वच्छता मोहीम , तालुक्यातील सर्वच प्राचीन मंदिरामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे . जेणेकरून युवा पिढीला



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनपटातून शौर्य , सेवा आणि श्रद्धेचे मोल युवकांना कळवा यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत अशी माहिती रोहा येथील शासकीय विश्रामगृहात शनिवार दि. ( २४) रोजी भाजपा ने घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत अमित घाग यांनी माहिती दिली . यावेळी रोशन चाफेकर, राकेश चाफेकर , कृष्णा बामणे, सचिन मोरे , वैभव कुलकर्णी यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते .

भारताच्या इतिहासात अनेक स्त्रियांनी समाजसेवेचा आणि शौर्यगाथा असणारी उदाहरणे आहेत त्यापैकी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर निश्चितच आहेत . त्यांचे कार्य मायेसारखी तळमळ होतीच परंतु त्या उत्तम एक आदर्श शासिका आणि समाजसेविका ओळखला जायच्या त्यामुळे भारतीय जनता पक्षांनी तालुक्यात युवा पिढीला त्यांच्या जीवनपट आधारित निबंध स्पर्धा , स्वच्छता मोहीम सेवेत उपक्रम राबवून युवा पिढीसमोर त्यांचा कार्याचा लेखाजो काय यानिमित्ताने मिळेल असेही अमित घाग यांनी सांगितले .

दरम्यान देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा स्वच्छतेचा नारा दिलेला आहे त्या अनुषंगाने रोहे शहरात सर्वच प्रभागात जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा पाटील यांच्या आदेशानुसार व तालुका प्रमुख या नात्याने सर्व पदाधिकाऱ्यांना सूचना करण्यात आहे की , कोणत्याही प्रभागात जनतेचे प्रश्न असतील मग स्वच्छता असेल किंवा अन्य प्रश्न ते तात्काळ स्वतः उभे राहून सोडवण्याचे निर्देश देखील असल्याने भाजपा शहर अध्यक्ष यज्ञेश भांड, शैलेश रावकर, रोशन चाफेकर ,वैभव कुलकर्णी , सुमित रिसबूड या सर्वच कार्यकर्ते स्वच्छता मोहिम गेल्या एक महिन्यापासून सुरू आहे . भारतीय जनता पार्टी या शहरात लोकशाहीनुसार कमळ हे चिन्ह घराघरा पोचवण्याचा काम करीत आहेत . त्यामुळे कोणत्याही प्रभागात येऊ नये अशी भाषा करू नये आपण महायुतीमध्ये आहोत

## मांत्रिकाने केले दागिने लंपास

**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

पोलीस ठाणे हद्दीत रहाणार्या महिला फिर्यादी यांचे मुलावर उपचार करण्याच्या बहाण्याने मांत्रिकाने ९३,५००/-रुपये किमतीचे सोन्याची अंगठी व सोन्याची चेन घेउन फसवणुक केल्याचीतक्रार पोलादपुर पोलिस ठाणेत करण्यात आली आहे.

फिर्यादी यांचे मुलगा आजारी आहे त्याचेवर कोणी करणी केली आहे ती बाजुला काढतो असे सांगुन विश्वास संपादन करून पुजा करावी लागेल असे सांगुन याकरीता सोन्याची अंगठी व सोन्याचीचैन आरोपी मागीतली दोन स्टीलचे डब्बे व तांदुळ मागुन त्यामध्ये दिलेले सोन्याचे दागिने टाकल्याचे भासवुन ते दोन्ही लंपास केले

## अष्टमीतील डायमंड संस्थेच्या अध्यक्षपदी समीर दर्जी यांची बिनविरोध निवड

**रोहे : प्रतिनिधी**

रोहे शहरातील अष्टमी मुस्लिम समाज जमातीच्या आधीपत्याखाली असलेल्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या डायमंड एजयुकेशन वेल्फअर असोसिएशन या संस्थेच्या अध्यक्षपदी तरुण होतकरू सामाजिक कार्यकर्ते समीर यासिन दर्जी यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

अष्टमी मुस्लिम समाज जमातीची वार्षिक सर्वसाधारण सभा समाज अध्यक्ष म. शफी पानसारी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी ( ता.२४) रोजी जामे मशीदच्या सभागृहात पार पडली.या सभेत डायमंड एज्यूकेशनल वेल्फअर असोसिएशन या संस्थेचा मागील २ वर्षाचा वार्षिक ताळेबंद अहवाल सचिव अल्ताफ चोरडेकर यांनी



सादर केला व तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या वेळी पुढील तीन वर्षाकरिता डायमंड संस्थेची नवीन कार्यकारणी मंडळाची निवड करण्यात आली. निवडणूक पिठासीन अधिकारी अरिफ पठाण यांच्याकडे कार्यकारी मंडळाच्या एकूण ११ जागा व २ स्विकृत जागांसाठी एकूण १५ सभासदांचे उमेदवारी अर्ज प्राप्त झाले.

संस्थेची निवड प्रक्रिया बिनविरोध व्हावी व हि परंपरा कायम ठीकवून ठेवण्यासाठी जेष्ठ सदस्य अ. समद बंद्री व यासिन पानसरे यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. तर समीर चोरडेकर व मोअजम नाडकर यांची स्विकृत सदस्य पदावर काम करण्याची तयारी दर्शविल्यानंतर इच्छा व्यक्त केल्यानंतर उर्वरित ११ जागांसाठी ११ उमेदवारी अर्ज शिल्लक राहिल्याने संपूर्ण निवड प्रक्रिया बिनविरोध पार पडल्या. यात प्रामुख्याने डायमंड या संस्थेच्या अध्यक्षपदी समीर दर्जी, उपाध्यक्ष खालिद बेबन, सचिव अफसर करजिकर, सह सचिव इम्तियाज दर्जी, खजिनदार मुनवर पठाण, कार्यकारणी मंडळ सदस्यपदी म.शफी पानसरे,अ.मजीद पठाण,इरफान दर्जी, मुशीर दर्जी, मुबीन दळवी, राहील नागोठकर त्याचप्रमाणे स्विकृत सदस्यपदी समीर चोरडेकर व मोअजम नाडकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

## चौल बेलाई येथे महाकाली मंदिराचा वर्धापन दिन

### ■ देवीचा वाडी भरणे उत्सवही उत्साहात साजरा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल बेलाई येथे प्राचीन महाकाली मंदिराचा वर्धापनदिन व देवीचा वाडी भरणे उत्सव रविवार दि. २५ मे२०२५ रोजी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने महाराष्ट्रात विखुरलेले त्वष्टा कासार ज्ञाती समाज बांधव देवीच्या उत्सव व वाडी भरणे कार्यक्रमास मोठया संख्येने एकत्रीत आला.

प्रतिवर्षी महाकाली मातेच्या मंदिरात देवीची वाडी भरणे व देवीचा वार्षिक महोत्सव वैशाख महिन्यात शुध्द एकादशीला देवीची वाडी भरण्याचा उत्सव साजरा करण्यात येतो. या उत्सवाचे दिवशी ८.३० वाजता चंद्रकांत गोंविद दांडेकर यांचे रेवदंडा निवासस्थानाहून देवी मुखवटा भव्य पालखी सोहळयास प्रारंभ झाला.

रेवदंडा बाजारपेठेत ठिकठिकाणी त्वष्टा कासार



ज्ञाती समाज बांधव व भगिनीने पालखी सोहळयाचे स्वागत करून देवी मुखवटाचे पुजा आरती केली.

हा देवी मुखवटा पालखी सोहळा सकाळी ११.३० अकरा वाजता चौल बेलाई येथील महाकाली मातेच्या मंदिरात पोहचला. या उत्सवासाठी महाकाली मंदिरात रंगरंगोटी करण्यात येऊन आकर्षक विदयुत रोषनाई करण्यात येते. तसेच महाकाली मातेस फुलांनी सजविण्यात येते. पावसाने जोरदार बसरणे सुरू असतना सुध्दा उत्सवाकरीता ठाणे, मुंबई व पुणा आदी संपुर्ण महाराष्ट्रात विखुरलेले त्वष्टा कासार ज्ञाती समाज बांधव मोठया संख्येने एकत्रीत आले होते, यावेळी समाजाच्या विशेष कर्तृत्वान व्यक्तीमत्व टिटवाळा येथील उदयोजक शिल्पकार प्रशांत रविंद्र गोडांबे, अनघा प्रशांत गोडांबे, तसेच कल्याण येथील उदयोजक पराग विलास ईश्वाद, प्रिया पराग इश्वाद, हे प्रमुख पाहूणे उपस्थित होते, त्यांना त्वष्टा कासार ज्ञाती संस्थान रेवदंडा यांचे वतीने सन्मानाने गौरविण्यात आले.

या उत्सवाचे व देवीची वाडी भरणे निमित्ताने रेवदंडा-चौल त्वष्टा कासार समाजाचे वतीने सकाळी ८.३० वाजता चंद्रकांत गोंविद दांडेकर यांचे रेवदंडा निवासस्थानाहून देवी मुखवटा भव्य पालखी सोहळा, सकाळी ११.०० वाजता ओमकार सुरेश वडके यांचे हस्ते देवीची महापुजा व देवीची वाडी भरणे कार्यक्रम, सकाळी ११.३० वाजता हळदी कुंकू, पाहूण्याची ओळख परिचय व सत्कार सोहळा, दुपारी १.०० वाजता देवीची आरती व महाप्रसाद सोहळा,दुपारी २.०० ते ५.०० स्थानिक महिलाचे कार्यक्रम, सायकांळी ५.३० ते ७.३० रेवदंडा श्री महाकाली भजन मंडळाचा भजनाचा कार्यक्रम आदी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्वष्टा कासार ज्ञाती संस्थान रेवदंडा यांचे वतीने देवी उत्सव व वाडी भरणे कार्यक्रमास अध्यक्ष ऋषी राजन वडके, कार्याध्यक्ष गणेश सुरेश वडके, खजिनदार अमोल शशिकांत वडके, सदस्य ओमकार सुरेश वडके, सल्लागार शंकत सुरेश वडके, सल्लागार मंगेश शांताराम वडके व त्वष्टा कासार समाज बांधव व भगिनी परिश्रम विशेष परिश्रम घेतले.

प्राचीन चौल व्यापारी बाजारपेठ म्हणून प्रसिध्दीस असून येथूनच समुद्रखाडीमार्गे देशविदेशात व्यापार सुरू होता. ऐतिहासिक काळात प्राचीन चौलचा अन्ययसाधारण महत्व असून वैभवशाली अशी ओळख सांगितली जाते.



**मुरुड** : परिसरात रविवारी दमदार पहिला पाऊस झाल्याने किनाऱ्यावर काळे ढग पसरले. या वातावरणात पर्यटकांनी पावसाचा आनंद घेतला. (छाया : सुधीर नाझरे)

## चौल नाका सुंदर नारायण मंदिरात रक्तदान शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलनाका सुंदर नारायण मंदिरात कै. समिर वैदय स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न झाला. रक्तदान व रक्तदात्यासाठी सदैव झटणारा मित्र अकस्मात हरपला, पण त्यांचे कार्य नेहमी स्मरणात रहावे, म्हणून कै. समिर वैदय मित्रमंडळाचे वतीने प्रतिवर्षी आयोजन करते.सालाबाद प्रमाणे कै. समिर वैदय मित्रमंडळाचे वतीने कै. समीर वैदय स्मृती प्रित्यर्थ चौलनाका सुंदर मंदिर येथे रक्तदान शिबीर रविवार दि. २५ मे २०२५ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत आयोजन केले होते. या रक्तदान शिबीरास जिल्हा रक्तपेढी संक्रमण अलिबाग-रायगडचे सहकार्य लाभले होते. या रक्तदान शिबीरास रक्तदात्याने मोठा प्रतिसाद दिल्याने एकूण ५० बाटल्या रक्तजमा झाले आले.



# पावसाने शेतकऱ्यांची उडवली धांदल

## एकंदर जनजीवनावर परिणाम



**तळा : प्रतिनिधी**

अवकाळी पडणाऱ्या पावसामुळे तळा तालुक्यात जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरवर्षीप्रमाणे व शेतकऱ्यांच्या अंदाजानुसार अवकाळी पाऊस पडला तरी तो एवढा पडत नसल्याने शेतीवर याचा परिणाम होण्याचा धोका आहे. त्यातच आता मान्सूनने दस्तक दिली असल्याने शेतकऱ्यांचे पूर्ण नियोजन बिघडले असल्याचे चित्र आहे.

ग्रामीण भागात शेतकरीवर्ग धुळवडीचे राब करण्याचे काम २४ मे पासून चांगला मुहुर्त काढून कामाला सुरुवात करत असतो, मात्र सध्या अवकाळी पडणाऱ्या पावसामुळे अनेक प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहेत. आंब्याचे पीक उशिरा आल्याने आंब्याचेही नुकसान झाले असून वीटभट्टीधारकांनाही या पावसाचा फटका बसला आहे तसेच घरे शाकारणीची कामे मे महिन्यात सुरू होतात, त्यातही समस्या निर्माण झाल्या आहेत.

सध्या लग्न समारंभाचे दिवस तिथीनुसार असल्याने अनेक गावात एक तरी लग्न समारंभ आहे. अंदाजे आठ ते नऊ दिवसांपासून दिवसातून एक दोन वेळा हा अवकाळी पाऊस पडत आहे. यामुळे लग्नसमारंभासाठी बांधलेला मांडवाची पुरती पावसाने भिजून दयनीय अवस्था होत आहे. मोठ्या आनंदाने हे विवाहसोहळा पार पडतात, मात्र या वर्षी अवकाळी पडणाऱ्या पावसामुळे लग्नघरी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नाईलाजास्तव मंडपावर प्लास्टिक कापड टाकून मंडप सजवले जात आहेत. अनेक ठिकाणी यामधे पाणी साठून पडले आहेत. त्यामुळे अनेक समस्यांना तोंड देत मंडप उभारून विवाह समारंभ पार पाडले जात आहेत.

अशातच अधूनमधून चाललेला विजेचा लपंडाव अशा अनेक अडचणींना सध्या समोरे जावे लागत असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.

# भिवपुरी रोड रेल्वेस्थानकातील पादचारी पुलावर साठतेय पाणी




कर्जत : प्रतिनिधी

मध्य रेल्वेवरील कर्जत दिशेकडून भिवपुरी रोड रेल्वेस्थानकात असलेल्या पादचारी पुलावर बनविण्यात आलेला पृष्ठभाग समपातळीत न बनविल्यामुळे पादचारी पुलावर पाणी साचते. त्यामुळे प्रवाशांना त्या पाण्यातून वाट काढत जावे लागत आहे.

भिवपुरी रोड स्थानकात कर्जत आणि मुंबई दिशेकडे असे दोन पादचारी पूल आहेत. यातील मुंबई दिशेकडे असलेला पादचारी पूल अरुंद असून या पुलावरून स्थानकाच्या बाहेर पडण्याची व्यवस्था आहे, मात्र या पुलावर पावसाचे पाणी साचून राहत आहे.

अद्याप मोसमी पाऊस पूर्णपणे सुरू झालेला नाही आणि तरीदेखील पुलावर पाणी साचून राहत आहे. पुलावरील पृष्ठभाग हा समपातळीत बनविला गेला नाही. त्यामुळे पुलावर पाणी साचून राहत आहे. त्याचा त्रास म्हणजे पुलावरून येणारे जाणारे प्रवासी यांना त्या पाण्यातून जावे लागत आहे तसेच काही भागात प्रवाशांना उड्या मारत जाण्याची वेळ आली आहे. त्यामुळे प्रवासी संघटनेच्या माध्यमातून मध्य रेल्वेकडे या पादचारी पुलावर साचून राहणाऱ्या पाण्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

# राष्ट्रवादीतर्फे प्रतिवर्षी गौरवशाली महाराष्ट्राची परंपरा कार्यक्रम साजरा करणार –खासदार सुनील तटकरे



**महाड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक, सामाजिक, अध्यात्मिक, परंपरा असलेल्या महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस राष्ट्रवादी काँग्रेस प्रतिवर्षी गौरवशाली महाराष्ट्राची परंपरेचर रूपाने साजरा करणार असल्याची ग्वाही पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी महाड येथे दिली.

६५ वर्षांपूर्वी संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश स्वीकारणाऱ्या राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पश्चात आज ६५ वर्षे राज्य स्थापनेला झाले काय इतिहास नवीन पिढीला समजावा म्हणून तसेच नवीन महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी युवकांचे योगदान प्राप्त व्हावे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे हा स्थापना दिवस यापुढे प्रतिवर्षी साजरा केला जाणार असल्याचे सांगून ऐतिहासिक शिवरायांची राजधानीचे ठिकाण असणाऱ्या व सामाजिक समतेचा हुंकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी या पुण्यभूमीत दिल्या कारणाने हा समारोप सोहळा महाड येथे आयोजित केल्याचे स्पष्ट केले.

बहुजन समाजाचे हित जपण्याचे कार्य महाराष्ट्रात सुरू असून विकसित राज्य म्हणून देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईशेजारी असणाऱ्या रायगड जिल्ह्याचे वैभव चंद्र–सूर्य असेपर्यंत कायम राहील यासाठी असे सोहाळे महत्त्वपूर्ण ठरतील, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमाप्रमाणे प्रत्येक महिन्याला महाडमध्ये सांस्कृतिक सोहळे व भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्याची खासदार सुनील तटकरे यांनी या वेळी घोषणा केली.

नव महाराष्ट्र घडवण्यासाठी आगामी काळात तरुण पिढीला बरोबर घेऊन मागील इतिहास लक्षात ठेव विकास योगदान देण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध व्हावे, असे आवाहन केले.

महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या कलांचे व लोककलांचे प्रदर्शन करणाऱ्या कलाकारांचा हा गौरवशाली महाराष्ट्राची परंपरा सांगणारा कार्यक्माला महाडकर नागरिक उदंड प्रतिसाद देतील असा विश्वास व्यक्त करून या समारोप कार्यक्रमासाठी महाडची निवड केल्याबद्दल त्यांनी खासदार सुनील तटकरे यांना धन्यवाद दिले.

आगामी काळात महाड, पोलादपूर, माणगाव या ठिकाणीदेखील अशाच पद्धतीचे कार्यक्रम आयोजित करावे आणि येथील नागरिकांना महाराष्ट्राच्या लोककलेची व परंपरेची नव्याने ओळख घडवावी, असेही जगताप यांनी नमूद केले.

# इंदापूर येथे लाभार्थ्यांना ३०७ दाखल्यांचे वाटप



**माणगाव : बातमीदार**

इंदापूर मंडळातील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय तळाशेत येथे शुक्रवारी (दि.२३) छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत शिबीराचे आयोजित करण्यात आले होते.

शिबिरामध्ये इंदापूर मंडळातील उपस्थित सर्व शेतकरी, नागरिकांना जिवंत ७/१२ नोंद झालेले एकूण १०७ तसेच ॲग्रीस्टॅक योजने अंतर्गत किसान प्रमाणपत्र ५७, संजय गांधी योजना ५, पीएम किसान योजना लाभार्थी १७, जातीचे दाखले २७, उत्पन्नाचे दाखले ४२, आधारकार्ड २३, मतदान ओळखपत्र ६, दिव्यांग व्यक्तींचे उत्पन्न दाखले २३ असे एकूण ३०७ दाखले इंदापूर मंडळ अधिकारी विश्वास गडदे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

या वेळी मंडळ अधिकारी विश्वास गडदे यांनी महसूल विभागाच्या विविध योजनांबाबत माहिती देऊन उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले. पीक पाहणी करण्याबाबतदेखील ग्रामस्थांना माहितीदेखील देण्यात आली.

या वेळी या कार्यक्रमाला इंदापूर मंडळातील तलाठी पुजा सोनवले, दक्षता अंबुर्ले, पूजा वारघडे, प्रणिता ठक्करवाड, सीएसी सेंटरचे प्रमुख उमेश साटम, मुकुंद सांगले, रोहित मोरे तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



**श्रीवर्धन : जोरदार पावसामुळे बोर्ली पंचतनमध्ये दिवसाढवळ्या अंधार पडल्याचे दिसून आले. त्यामुळे वाहनचालक आपल्या गाड्यांच्या लाईट लाऊन मार्गक्रमण करीत होते.**

## सहज सेवा फाउंडेशनकडून खोपोलीत पाताळगंगा आरती

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहराची औद्योगिक तसेच नागरी जीवनाची तहान पाताळगंगा नदीमुळे भागत आहे. आपल्या शहरात लाभलेल्या या वरदानाचे महत्त्व जनमानसात पोहचवण्यासाठी नवीन संकल्प म्हणून खोपोली येथील गगनगिरी आश्रमसमोरील नदीभोवतालच्या पटांगणात नदीचया स्वचछतेबाबत जागरुकता निर्माण होण्यासाठी सहज सेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून नदी आरती व पूजन महोत्सव उत्साहात पार पडले. या वेळी नदीचे संवर्धन व स्वच्छता ठेवण्याचा संकल्प करण्यात आला.

खोपोली येथील उगम पावणाऱ्या पाताळगंगा नदीपात्रात अनेक ठिकाणी कचरा टाकण्यात येतो. बऱ्याच ठिकाणी सांडपाणी नदीत सोडले जाते. कंपनीच्या दूषित पाण्यामुळे बारमाही वाहणारी पाताळगंगा नदी प्रदूषित होत चालली आहे. प्रशासनाने जागरूक राहून नदी प्रदूषित होण्यापासून कठोर पावले उचलावीत. वाया जाणाऱ्या पाण्याचे जतन करावे. नदीवर शहराच्या सौंदर्यात भर घालणारे सुशोभीकरण करावे, अशी मागणी सहज सेवा फाऊंडेशनतर्फे करण्यात येत आहे तसेच जनसामान्यात जागरुकता येण्यासाठी 'आपली नदी, आपली जबाबदारी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २४ मे रोजी पाताळगंगा नदी आरती व पूजन महोत्सव उत्साहात पार पडला. त्याचबरोबर नदी घाटावर दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी पूजन करण्यात येईल, असाही संकल्प या वेळी करण्यात आला.

या वेळी नदीकिनारी दिव्यांची आरास करण्यात आली. खोपोली येथील मुक्ताई महिला भजनी मंडळाने सुरेख गीते गाऊन वातावरण भक्तिमय केले, तर आनंद शाळेतील शिक्षिका राधिका खानवलकर व ह.भ.प. सुधाकर पाटील यांनी पातळगंगा नदी प्रति तयार केलेल्या आरतीबद्दल सहज सेवा फाउंडेशनतर्फे सन्मान करण्यात आला.

या वेळी उपक्रम प्रमुख सीमा त्रिपाठी, राजेंद्र फक्के, डॉ.सुनील पाटील, सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, खालापूर तालुका प्रमुख मोहन केदार यांनी आपले विचार व्यक्त केले.

या उपक्रमास विरेश्वर ग्रामस्थ मंडळ, शक्ती सेवा श्रद्धा फाउंडेशन, शीळफाटा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष अमोल शहाणे, राहुल जाधव, दिवेश राठोड, विनोद राजपूत, संदीप दुबे, अनिता शहा, अपर्णा साठे, जगदीश जाखोटीया, मंजु उपाध्याय, नीरज राय, रुपेश देशमुख यांचे विशेष सहकार्य लाभले.

उपक्रमास समाजातील विविध क्षेत्रातील मंडळींनी योगदान देऊन उपस्थित राहिल्याबद्दल सहज सेवा फाऊंडेशनच्या महिला अध्यक्षा निलम पाटील, सचिव अखिलेश पाटील, खजिनदार संतोष गायकर यांनी आभार मानले.



## अनिल सुर्वे कोकण विभागीय अध्यक्षपदी

**रोहे : प्रतिनिधी**



परीट धोबी समाजाच्या न्यायी हक्कासाठी लढणारे व समाजासाठी झटणारे परीट धोबी सेवा मंडळाचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष, माजी अध्यक्ष रोहा अष्टमी येथील अनिल सुर्वे यांची समाजाच्या आरक्षण न्यायिक समितीच्या कोकण विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीचे पत्र अध्यक्ष राजेंद्र आहेर, कार्याध्यक्ष राजेंद्र उंबरकर, संयोजक एकनाथ बोरसे यांनी दिले. सुर्वे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली समाजातील आरक्षणाचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले.

नियुक्तीबद्दल महाराष्ट्र उपाध्यक्ष दीपक कदम, सुभाष कदम, भारती जाधव, पुणे अध्यक्ष संतोष भालेकर, किशोर सुर्वे, मनोज सुर्वे, संदिप सुर्वे, रमेश सुर्वे, प्रकाश सुर्वे, आदींनी सुर्वे यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जंजिरा किल्ल्याचे दरवाजे २६ मेपासून राहणार बंद

**मुरूड : प्रतिनिधी**

जसा पावसाळा जवळ येतो त्या वेळी समुद्र रौद्र रूप धारण करून किनारी भागात मोठ मोठ्या लाटा उसळत असतात. अशावेळी पर्यटकांना कोणताही धोका पोहचू नये यासाठी सुरक्षेच्या कारणास्तव मुरुड तालुक्यातील राजपुरी बंदराजवळील समुद्रात असणारा ऐतिहासिक जंजिरा किल्लाचे दरवाजे २६ मेपासून बंद होणार आहेत.

दरम्यान, रविवारी सकाळपासून जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्याने आज पासूनच जंजिरा किल्ला वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात आली.

राजपुरी जेट्टीवरुन जंजिरा किल्ल पाहण्यासाठी शिडाच्या बोटीद्वारे नेले जात असते. या शिडाच्या बोटीसुद्धा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून बंद केल्या जाणार आहेत.

पुरातत्व संशोधन विभागाचे सहाय्यक संवर्धक बजरंग येलीकर यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना म्हटले की, समुद्रातील सुरक्षिततेच्या कारणास्तव दरवर्षी जंजिरा जलदुर्ग २६ मेपासून पर्यटकांना आतून पाहण्यासाठी बंद केला जातो. पर्यटकांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. या कालावधीत समुद्राच्या मोठ्या लाटा उसळत असल्याने धोका निर्माण होऊ शकतो. यासाठी शासकीय स्तरावरून निर्णय घेतला जातो. २६ मेपासून जंजिऱ्याचे दरवाजे बंद करावेत, अशा स्वरूपाचे आदेश मेरिटाईम बोर्ड आणि पुरातत्त्व खात्याला प्राप्त झाले आहेत. आजही खराब वातावरणामुळे किल्ला बंद ठेवण्यात आला आहे. उद्याही खराब हवामान असेल तर किल्ला बंद ठेवण्यात येईल यांची नोंद पर्यटकांनी घ्यावी.



## खेलो इंडिया बीच स्पर्धेत
# महाराष्ट्राला उपविजेतेपद



**दीव : वृत्तसंस्था**

पॅरा, युवा पाठोपाठ बीच खेलो इंडिया स्पर्धेतही महाराष्ट्राने पदकांची लयलूट करीत आपला ठसा उमटविला. पहिल्या बीच स्पर्धेत महाराष्ट्राने पाच सुवर्णांसह २० पदकांची कमाई करीत उपविजेतेपद पटकावले.

दीवच्या घोघला समुद्र किनाऱ्यावर संपलेल्या स्पर्धेत महाराष्ट्राचा जयजयकार शेवटच्या दिवसापर्यंत घुमत राहिला. पदकतक्यात पाच सुवर्ण, पाच रौप्य, १० कांस्य अशी एकूण २० पदके जिंकून महाराष्ट्राने दुसरे स्थान संपादन केले. पाच सुवर्ण, सहा रौप्य, तीन कांस्य अशी एकूण १४ पदकांची कमाई करीत मणिपूरने विजेतेपद खेचून आणले. सर्वाधिक २० पदके जिंकूनही केवळ एक रौप्यपदक कमी असल्याने महाराष्ट्राला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. स्पर्धेत महाराष्ट्रासह मणिपूर, नागालँड, हरियाणा व जम्मू-काश्मिर संघाने पाच सुवर्णपदके जिंकण्याचा करिश्मा घडविला. रौप्यपदकांच्या शर्यतीत महाराष्ट्र मागे राहिला.

दीव येथील ऐतिहासिक आयएनएस खुकरी स्मारक परिसरातील समारोप समारंभात केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला उपविजेतेपदकाचा करंडक देऊन गौरविण्यात आले. पथकप्रमुख नवनाथ फरताडे, क्रीडाधिकारी अरुण पाटील यांच्यासह मराठमोळ्या खेळाडूंनी उपविजेतेपदाचा करंडक स्वीकारला. यानंतर महाराष्ट्राच्या जयघोषाने परिसर दुमदुमला.

खेलो इंडिया स्पर्धेतील यशाबद्दल महाराष्ट्राच्या खेळाडूंचे केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी आपल्या भाषणात कौतुक केले. खेलो इंडिया बीच गेम्सने एका नवीन युगाची सुरुवात केली आहे, असे सांगून त्या पुढे म्हणाल्या की, खेळाडूंनी आपल्या प्रतिभेच्या तेजाने दीवचे समुद्रकिनारे उजळवले आहेत. खेलो इंडिया बीच गेम्स या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या गेम्सनी अनेक रोमांचक आणि कमी ज्ञात असलेल्या किनारी आणि जल क्रीडांकडे लक्ष वेधले आहे.

महाराष्ट्राच्या पदक विजेत्या खेळाडूंचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर व क्रीडा सहसंचालक सुधीर मोरे यांनी दृकश्राव्य प्रणालीव्दारे अभिनंदन केले. प्रथमच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राचे ७८ खेळाडू सहभागी झाले होते. यात ४८ पुरुष व ३० महिला खेळाडूंचा समावेश होता. पहिल्या स्पर्धेत बीच सॉकर, बीच कबड्डी, बीच पेंचक सिलट, सागरी जलतरण या स्पर्धेत महाराष्ट्राने पदकाची लयलूट केली. स्पर्धेत भारतातील ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी भाग घेतला होता.

महाराष्ट्राने पिंच्याक सिलॅटमध्ये तीन सुवर्ण, चार रौप्य व पाच कांस्य अशी एकूण १२ पदकांची कमाई करीत वर्चस्व गाजवले. सागरी जलतरणातही दोन सुवर्ण, एक रौप्य व दोन कांस्यपदके महाराष्ट्राच्या नावापुढे झळकवली. बीच सॉकर, बीच कबड्डी या सांघिक खेळातही कांस्यपदकावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नाव कोरले. मुंबईच्या वैभव काळेने सुवर्णासह तीन पदके, तर साताऱ्याच्या दीक्षा यादवने दोन सुवर्णपदकांना गवसणी घेत महाराष्ट्राचे नाव गाजवले.

# कुश मैनीने रचला इतिहास
## एफ२ स्प्रिंट रेसमध्ये विजेता होणारा पहिला भारतीय




**मोनॅको : वृत्तसंस्था**

भारताच्या कुश मैनी याने प्रतिष्ठित एफ२ मोनॅको ग्रां प्री २०२५मधील स्प्रिंट रेस जिंकत इतिहास रचला आहे. या स्पर्धेत विजयी होणारा पहिला भारतीय चालक ठरण्याचा मान त्याला मिळाला आहे. D-MS Lucas Oil टीमसाठी खेळताना त्याने जबरदस्त कामगिरी केली. या विजयामुळे कुशने केवळ स्पर्धा नाही जिंकली, तर भारतीय मोटरस्पोर्टचा तिरंगा जागतिक स्तरावर फडकावला.

टीमचा रिझर्व्ह ड्रायव्हर असलेल्या कुशने पॉलेवरून सुरुवात करत ३० फेऱ्यांची ही रेस आघाडीवर राहून पूर्ण केली. या विजयानंतर भारताचे राष्ट्रगीत मोनॅकोमध्ये वाजले आणि कुशने त्याचा अभिमानाने उद्घोष केला. हा क्षण संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा ठरला. या यशावर आनंद महिंद्रा यांच्यासह संपूर्ण देशाने कुशवर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

आता कुशचे लक्ष्य रविवारची फीचर रेस आणि त्यानंतर येणाऱ्या बार्सिलोना ग्रां प्री कडे आहे. मोनॅकोतील हा ऐतिहासिक विजय त्याच्या पुढील कारकिर्दीसाठी प्रेरणादायी ठरेल.

> **एफ१ आणि मोनॅकोमध्ये जिंकणारा पहिला भारतीय बनणे हे एक स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे. माझ्या टीमचे आणि सर्व समर्थकांचे आभार मानतो. आपण विश्वास ठेवत राहू!**
> **–कुशने मैनी**




# ...म्हणून बुमराह, राहुल, पंतऐवजी गिल कर्णधार!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल झाल्यानंतर भारतीय संघ कसोटी मालिकेसाठी इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. दोन्ही संघांमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका रंगणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. रोहित शर्माचा उत्तराधिकारी म्हणून शुबमन गिलची निवड करण्यात आली आहे. जसप्रीत बुमराह, केएल राहुल आणि ऋषभ पंतसारखे खेळाडू असताना ही जबाबदारी शुबमन गिलकडे का सोपवण्यात आली आहे.

शुबमन गिलकडे भारतीय कसोटी संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवणे हा आश्चर्यचकित करणारा निर्णय नाही. झिम्बाब्वे दौऱ्यासाठी गिलकडे भारतीय टी-२० संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली गेली होती. त्यानंतर श्रीलंका दौऱ्यावर सूर्यकुमार यादव कर्णधार असताना उपकर्णधारपदाची जबाबदारी गिलकडे दिली गेली होती. इतकेच नव्हे; तर चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारीही गिलकडे सोपवण्यात आली होती.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर रोहित शर्मा कर्णधार असताना उपकर्णधारपदाची जबाबदारी जसप्रीत बुमराहकडे सोपवली गेली होती. रोहितच्या अनुपस्थितीत तो भारतीय संघाचे नेतृत्व करताना दिसून आला होता, मात्र मालिकेतील शेवटच्या कसोटी सामन्यात त्याला दुखापतीमुळे बाहेर राहावे लागले होते. पाच कसोटी सामन्यांची मालिका ही खूप मोठी मालिका असते. त्यामुळे बुमराह सर्व पाच सामने खेळणार की नाही याबाबतही शंका आहे. अशा स्थितीत बुमराहकडे कर्णधारपदाची जबाबदारी देणे योग्य ठरणार नाही. तो सर्व पाच सामन्यांसाठी उपलब्ध असण्याची शक्यता खूप कमी आहे. त्यामुळे त्याचा वर्कलोड मॅनेज करण्यासाठी ही जबाबदारी बुमराहकडे सोपवली गेली नाही.

केएल राहुल हा भारतीय संघातील अनुभवी खेळाडूंपैकी एक आहे, मात्र त्याला आपलं संघातील स्थान टिकवून ठेवता आलेले नाही. अनेकदा त्याला फ्लॉप कामगिरीमुळे संघाबाहेर व्हावे लागले आहे. हेच कारण आहे की, त्याच्याकडे ही जबाबदारी सोपवली गेलेली नाही. ऋषभ पंतकडे भारतीय कसोटी संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवली गेली आहे. कर्णधार म्हणून पंतचा रेकॉर्ड तितका खास राहिलेला नाही. त्यामुळे ही जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवली गेली आहे.

# आयपीएलमध्ये दिल्लीचा शेवट गोड! पंजाबचा पराभव

**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएल सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने पंजाब किंग्जवर विजय मिळवत शेवट गोड केला. प्रथम फलंदाजी करताना पंजाबने २० षटकांअखेर ८ गडी बाद २०६ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करताना करूण नायरने महत्त्वपूर्ण खेळी केली. शेवटी ट्रिस्टन स्टब्स आणि समीर रिझवीने मिळून दिल्लीला विजय मिळवून दिला.



या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पंजाब किंग्जकडून प्रियांश आर्य आणि प्रभसिमनर सिंगची जोडी मैदानावर आली. या जोडीला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. प्रियांश अवघ्या ६ धावा करत माघारी परतला, तर प्रभसिमरनला २८ धावा करता आल्या. सलामी जोडी स्वस्तात माघारी परतल्यानंतर जोस इंग्लिशने आकर्षक फटके मारले. त्याने तीन चौकार आणि दोन षटकारांच्या सहाय्याने ३२ धावा केल्या. संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरने ३४ चेंडूंचा सामना करत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या सहाय्याने ५३ धावांची खेळी केली. नेहाल वढेरा १६ धावांवर माघारी परतला. शेवटी मार्कस स्टोइनिसने मोठे फटके मारले. त्याने तीन चौकार आणि चार षटकारांच्या सहाय्याने नाबाद ४४ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर पंजाब किंग्जने २० षटकांअखेर आठ गडी बाद २०६ धावांचा डोंगर उभारला होता.

२०७ धावांचा पाठलाग करण्यासाठी दिल्लीकडून आलेल्या केएल राहुल आणि फाफ डू प्लेसिस या जोडीने अर्धशतकी सलामी दिली. दोघांनी मिळून ५५ धावा जोडल्या. केएल राहुलने सहा चौकार आणि एक षटकारांच्या सहाय्याने ३५ धावा, तर प्लेसिसने २३ धावा केल्या. करुण नायरने एक बाजू धरून ठेवली होती, मात्र तो ४४ धावांवर बाद होऊन माघारी परतला. नायर बाद झाल्यानंतर ट्रिस्टन स्टब्स आणि समीर रिझवीने मिळून महत्त्वपूर्ण धावा करत संघाला विजय मिळवून दिला.

### पंजाबची नंबर १ बनण्याची संधी हुकली

हा सामना पंजाब किंग्ज संघासाठी अतिशय महत्त्वाचा होता, कारण हा सामना जिंकून पंजाबकडे नंबर १वर पोहचण्यची संधी होती, मात्र पंजाबने सामना गमावला आहे. पंजाबने आतापर्यंत १७ गुणांची कमाई केली आहे. हा सामना जिंकून पंजाबकडे १९ गुणांसह अव्वल स्थान गाठण्याची संधी होती. पंजाबच्या पराभवामुळे आता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि मुंबई इंडियन्स संघासाठी नंबर १ स्थानी जाण्याचे दार उघडले आहे.

# हॅरी ब्रूकने घेतला अद्भूत झेल

**नॉटिंगम** : इंग्लंड आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये चार दिवसीय कसोटी सामना पार पडला. या सामन्यात इंग्लंडने वर्चस्व कायम राखत झिम्बाब्वेवर एक डाव आणि ४५ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात इंग्लंडच्या हॅरी ब्रूकने स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करताना अविश्वसनीय झेल घेतला, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

इंग्लंडकडून ४८वे षटक टाकण्यासाठी बेन स्टोक्स गोलंदाजीला आला. या षटकातील चौथ्या चेंडूवर ऑफ साईडच्या दिशेने कट करण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू बॅटची कडा घेत स्लिपमध्ये असलेल्या हॅरी ब्रूकच्या हातात गेला. ब्रूकने उडी मारून उजव्या हाताने शानदार झेल घेतला.

# राष्ट्रीय लाठीकाठी स्पर्धेत अलिबागच्या खेळाडूंना पदके

**अलिबाग : प्रतिनिधी**

तिसरी एमजीएफआय राष्ट्रीय लाठीकाठी स्पर्धा नुकतीच दिल्ली येथे झाली. या स्पर्धेत अलिबागच्या खेळाडूंनी १७ सुवर्णपदके पटकावली. फेडरेशन कपमध्ये १५ सुवर्ण, चार रौप्य व चार कांस्यपदकाची कमाई केली.




रूद्रा विनय पिळणकर, सिमरन संतोष ठाकूर, मंथन वैभव कदम, देवदत्त मनीष पडवळ यांनी प्रत्येकी तीन सुवर्णपदक, आराध्या अभिनव मगर, श्रीयश संजित म्हात्रे दोन सुवर्ण व एक रौप्यपदक, आराध्या पंडित नखाते, वेद वैभव कदम, श्लोक अतुल जाधव, ऋग्वेद विकास नाईक दोन सुवर्ण व एक कांस्यपदक, अवनी राजेंद्र कवळे, हार्दिक संतोष अकोलकर, शिव देवजी हिलम दोन सुवर्णपदक, भूमी मनोज मोरे, आयुष अभिनवन मगर यांनी एक सुवर्ण व एक रौप्यपदक जिंकले.

आंतरराष्ट्रीय पंच प्रियांका गुंजाळ, राष्ट्रीय पंच वेदांत सुर्वे, राज्यस्तरीय पंच सिद्धार्थ पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. यशस्वी खेळाडूंचे अलिबाग रायगडचे अध्यक्ष प्रमोद मसाल यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com